
# [illegible] चिपळूणक

# चरित्र



लो. टिळक यांचे निबंधासह

लेखक—विनायक महादेव [illegible]

मुद्रक
**शंकर नरहर जोशी** यांनी चित्रशाळा छापखान्यांत १०२६
सदाशिव पेठ, पुणें येथें छापिलें.

प्रकाशक—विनायक महादेव भुस्कुटे, पेठ शनवार घर
नंबर ५८२, महाराष्ट्र मोफत वाचनालय.

स. ३. ५. २४१०

# प्रस्तावना.

ता. १७ मार्च १८८२ या दिवशीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा मृत्युलोकचा अवतार संपला. वयाच्या २४ व्या वर्षापासून जीं अनेक कार्ये विष्णुशास्त्र्यांनी अंगावर घेऊन पार पाडलीं त्या कार्यांच्या योगानें निजलेला महाराष्ट्र थोडासा जागा होतो न होतो तोंच विष्णु-शास्त्री यांना स्वतःलच ज्या दिवशीं कायमची झोप लागली त्या दिवसाचें महाराष्ट्रीयांस स्मरण करून देण्यासाठीं हें लहानसें पुस्तक प्रकाशित होत आहे.

विष्णुशास्त्र्यांच्या मृत्यूचें स्मरण म्हणजे एका दृष्टीनें जरी पुण्य-तिथीचें स्मरण असलें, तरी दुसऱ्या एका दृष्टीनें तें एका अमंगल तिथीचेंच स्मरण होय. कारण, विष्णुशास्त्री ज्या दिवशीं परलोकवासी झाले. तो दिवस महाराष्ट्राच्या इतिहासांत दुर्भाग्याचा असाच सदैव समजला जाईल.

विष्णुशास्त्री हे त्यांच्या पिढींल लोकोत्तर पुरुष होते, किंबहुना सबंध पिढीला नवीन दिशा दाखवून देणारे असे एक मार्गदर्शक होते यांत संशय नाहीं. महाराष्ट्रीयांचे आचार आणि विचार विष्णुशा-स्त्र्यांच्याकाळीं अत्यंत अनिष्ट अशा दिशेकडे झुकलेले होते. स्वतः-विषयीं, स्वतःच्या पूर्वजांविषयीं, इतिहासाविषयीं, धर्माविषयीं सर्व महाराष्ट्रीयांच्या मनांत जी तिरस्कार बुद्धि परिस्थितीमुळें उत्पन्न झाली होती तिच्यावर घाव घालून सर्वांच्या अंतःकरणांतील निद्रित अभिमानाला डवचून जागृत करण्याचें कार्य विष्णुशास्त्र्यांनी सतत आठ वर्षे केलें. आठ वर्षांत त्यांनीं जें कार्य केलें तें दुसऱ्या एखाद्या माणसाचे हातून ८० वर्षांत झालें असतें कीं नाहीं याची शंका आहे. इतक्या थोड्या अवधींत विष्णु-शास्त्र्यांनीं येवढें प्रचंड कार्य करून दाखविलें याचें कारण

ऐवढेंच कीं, अगदी विद्यार्थी-दशेपासून त्यांच्या बुद्धिची आणि अंतःकरणाची त्या कार्यासाठीं तयारी चाललेली होती. विद्यार्थी-दशेंत अत्यंत विस्तृत असें वाचन त्यांनीं केलें म्हणूनच निबंधमालेचे ८४ अंक त्यांनीं कोणाचीहि मदत न घेतां लिहीले आणि प्रत्येक अंकांतील लेखाच्या विद्वत्तेनें, ताजेपणानें आणि श्रीमंतीनें त्यांनीं सर्व रसिक वाचकांस उल्हासित व उद्दीपित करून सोडलें. त्यांची निबंधमाला म्हणजे एक अत्यंत मौल्यवान असा ज्ञानसंग्रह आहे येवढेंच नव्हे तर, ती निबंधमाला म्हणजे स्वदेशाभिमानाची एक जळती ज्योत आहे. विष्णुशास्त्री महाराष्ट्रीयांच्या प्रेमाला आणि आदराला पात्र झाले आहेत. ते केवळ त्यांच्या विद्वत्तेमुळें नव्हे, तर त्यांच्या संबंध जीवन प्रवाहांत स्वदेशाभिमानाचा जो जिवंतपणा सहज दृष्टीस पडतो त्यामुळें होय. त्यांच्या विविध गुणांनें संबंध पिढीवर त्यांनीं आपल्या विचारांचा आणि आचारांचा ठसा उमटविला आणि म्हणूनच लो. टिळक यांनीं आपल्या निबंधांत त्यांस " एका पिढीचे जनक " असें म्हटलें आहे. हा निबंध वाचून सर्व "महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत स्वदेश प्रीति उत्पन्न होवो, आणि ज्या महाराष्ट्र मोफत वाचनालया " नें या निबंध प्रकाशनाचें लहानसें पण अत्यंत उपयुक्त असें काम केलें त्यास सर्व शहरवासीयाकडून मदत होवो अशी प्रार्थना आहे.

पुणें. ता.
१६-३-१९२१ } नारायण सीताराम फडके.

# दोन शब्द.

महाराष्ट्र मोफत वाचनालयाचा एक स्वयंसेवक या नात्यानें ही वाङ्मयात्मक अत्यल्प सेवा वाचनालयाच्या माझ्या सर्व स्वयंसेवक बंधूंना मी सादर करीत आहें. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें स्मारक म्हणूनच महाराष्ट्र मोफतवाचनालय ही संस्था काढण्यांत आली व पहिलीं दोन तीन वर्षें ही संस्था शास्त्रीबुवांच्या वाड्यांतच होती; पण कांहीं अपरिहार्य कारणामुळें वाचनालय तेथून काढून आज दुसरीकडे चालू ठेवावें लागत असलें तरी शास्त्रीबुवांचें स्मारकपणाचें नातें केंव्हांही अखंडच राहील. शास्त्रीबुवांचें स्मारक म्हणूनच निघालेल्या या संस्थेनें गेलीं दोन वर्षें शास्त्रीबुवांच्या पुण्यतिथीचा उत्सव केला. या उत्सवाच्या वेळीं वाचनालयाच्या तर्फे थोर पुरुषांचीं लहान लहान चरित्रें प्रसिद्ध करावीं असें वाचनालयाच्या स्वयंसेवक मंडळाच्या मनांत होतें व मंडळीचा हा हेतू अल्पांशानें कां होईना सिद्ध होण्याचा परमेश्वर कृपेनें आज योग योग आला आहे. कै० शास्त्रीबुवा यांचें चरित्र तयार करण्यांत मी फारसे परिश्रम केले आहेत अशांतलाही भाग नाहीं शास्त्रीबुवांचे बंधू रा० लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं लिहिलेल्या विस्तृत चरित्राच्याच आधारें हें लहानसें चरित्र मी तयार केलें आहें. शास्त्रीबुवांच्या आयुष्यक्रमांतील सर्व ठळक ठळक गोष्टींचें थोडक्यांत संकलित वर्णन करण्यापेक्षां मी यांत जास्त कांहींच केलें नाहीं. नवीन पिढीला कै० विष्णुशास्त्री यांच्या संबंधानें थोडक्यांत सर्व माहिती तरी असावी एवढ्याच हेतूनें हें चरित्र मी तयार केलें. कै० विष्णुशास्त्री यांचें चरित्र कशाप्रकारचें असावें, कोणत्या धोरणानें ते लिहिले जावें याचें दिग्दर्शन सोबत जोडलेल्या लो० टिळक यांच्या निबंधावरून कळून येण्याजोगें आहे. लो० टिळक यांचा शास्त्रीबुवांच्या वेळच्या परिस्थितीसंबंधाचा

निबंध वरील कारणाकरितां ज्याप्रमाणें जोडला आहे त्याप्रमाणें लो० टिळक वगैरे राष्ट्रीय पुढाऱ्यांची शास्त्रीबुवांच्या कामगिरी-संबंधानें काय कल्पना होती व नवीन पिढीनें त्यापासून कोणता बोध घ्यावा हें दाखविण्याच्या उद्देशानेंहि हा निबंध या पुस्तकांत सामील केला आहे. अशारीतीनें शास्त्रीबुवांचें चरित्र व त्यांची योग्यता या दोन्हीं गोष्टी या छोट्याशा पुस्तकांत साधण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकांचें सर्व उत्पन्न महाराष्ट्र मोफत वाचनालय चालविण्याच्या कामींच खर्ची पडावयाचें आहे तेव्हां माझे तरुण देशबंधू ही अल्पसेवा गोड करून असल्या प्रयत्नांना उत्तेजन देतील अशी आशा बाळगून व हे पुस्तक तयार करण्याच्या कामीं ज्या स्वयंसेवकांनीं मला मदत केली त्यांचे आणि एवढ्या थोडक्या अवकाशांतहि चित्र शाळेच्या मालकांनीं हें पुस्तक छापून दिलें याबद्दल त्यांचें आभार मानून ही लहानशी प्रस्तावना संपवितो.

ता. ५ मार्च १९२१.
पुणें.

महाराष्ट्र मोफत वाचनालयाचा स्वयंसेवक
विनायक महादेव भुसकुटे.

# कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र.

## पूर्ववृत्त व बालपण.

महाराष्ट्रांत इंग्रजी अमलानंतर जे थोर पुरुष होऊन गेले त्यांत कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. चिपळूणकरांचें घराणें हें मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पावस गांवचे राहणारे. शास्त्रीबोवांचा सहावा किंवा सातवा पूर्वज सुमारें १७ वे शतकाचे आरंभीं त्रिंबकेश्वरीं येऊन राहिला. शास्त्रीबोवांचे चवथे पूर्वज महादाजीपंत यांनीं पेशवाईत श्रीत्रिंबकेश्वराजवळ श्रीहर्ष किल्ल्याची फडणीशी संपादन केली होती. चिपळूणकरांचे घराण्यांत ही फडणीशी जवळ जवळ पेशवाई अखेर होती. १८०२ सालीं दक्षिणेत यशवंतराव होळकरानें दंगा माजविला त्या वेळीं चिपळूणकरांच्या घराण्यांतून फडणिशी जाऊन ते अगदीं निराधार झाले. नंतर याच वेळीं पेशव्यांचे पिढीजात नोकर असलेलें हें घराणें पुण्याकडे पेशव्यांचा आश्रय घेण्याकरितां आलें. शास्त्रीबोवांचे आजे रा. हरीपंत यांनीं पुण्यास आल्यावर बाजीराव पेशवे यांचे बंधु चिमाजीअप्पा यांचेजवळ शागिर्दी पतकरली. १८१८ सालीं पेशवाई नष्ट झाली व बाजीरावसाहेब चिमाजीअप्पासह ब्रह्मावर्तास निघून गेले. हरीपंतानें मात्र पुणें सोडलें नाहीं व एक लहानसें अफूचें दुकान घालून पुष्कळ वर्षे त्यांनीं गरिबीनें काढलीं.

## कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर.

शास्त्रीबोवांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म सन १८२४ सालीं पुण्यास झाला. लहानपणापासूनच फार हुषार व बुद्धिमान म्हणून कृष्णशास्त्री यांची प्रसिद्धी होती. प्रथम कांहीं वर्षे वेदपठण करून

पुढें पुणें पाठशाळेंत कृष्णशास्त्री यांनीं शास्त्राचें अध्ययन केलें. कृष्णशास्त्री बुद्धिवान असले तरी त्यांचें बुद्धिमत्तेचें चीज होण्यास इंग्रजी शिक्षण झालें पाहिजे ही गोष्ट पाठशाळेंतील त्यांचे गुरु मोरशास्त्री साठे यांनीं कृष्णशास्त्री यांचे मनांत भरविली. " याउपर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा राहणार नाहीं, तूं शहाणा असलास तर इंग्रजी शीक." या गुरूंच्या उपदेशावरून कृष्णशास्त्री यांनीं वयाचे पंचवीसावे वर्षी इंग्रजी शिकण्याचा निश्चय केला. शास्त्रीबुवांच्या अलौकिक बुद्धीस जबरदस्त चिकाटीची जोड मिळाली व लवकरच त्यांनीं इंग्रजींत प्रावीण्य संपादन केलें. वेदपठण, शास्त्राध्यायन व शेवटीं इंग्रजी विद्येचा अभ्यास हीं केल्यानें जुने पंडितांत व नवीन विद्वानांत यांची मोठी वहा होऊं लागली व ती आमरणांत टिकली कृष्णशास्त्री यांना १८५२ सालीं, ट्रान्सलेटर एक्झीबिशनरची जागा मिळाली. नंतर ते पूना कॉलेजमध्यें मराठीचे असिस्टंट प्रोफेसर झाले. १८५९ सालीं कृष्णशास्त्री यांची बदली दक्षिणाप्राईस कमेटीचे सेक्रेटरीचे जागीं झाली. नंतर १८६५ सालीं पुनाट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल, यापुढें १८६८ सालीं 'रिपोर्टर ऑन दी नेटिव्ह प्रेस वगैरे कामें त्यानीं केलीं. कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर हे केवळ बड्या बड्या सरकारी नोकऱ्या करून व जन्मभर पैसा मिळवीत राहण्यांतच इतिकर्तव्यता मानणारे नव्हते. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे इकडील प्रयत्न निष्फळ करण्याकरितां व देशांतील तरुणपिढीत स्वधर्माभिमान जागृत करण्याकरितां त्या वेळच्या कांहीं विद्वान मंडळींनीं " विचारलहरी " नांवाचें एक मासिक काढलें होतें. ह्या मंडळींत कृष्णशास्त्री यांनीं बराच पुढाकार घेतला होता, त्यामुळें त्यांच्यावर सहजच सरकारी अधिकाऱ्यांची गैरमर्जी झाली; आणि कांहीं दिवस त्यांचे नोकरीवर सुद्धां गदा आली. तथापि कृष्णशास्त्री यांनीं या गोष्टीची पर्वा न करितां ग्रंथ लिहून वर्तमानपत्र चालवून, खाजगी इंग्रजी शाळा काढून स्वतंत्र रीतीनें चरितार्थ चालविण्याचा संकल्प केला होता. सरकारी नोकरींत असतांनाही

कृष्णशास्त्री यांनीं बरीच ग्रंथरचना केली. शालापत्रकांत मराठी व्याकरणावर पंचवीस निबंध, याखेरीज अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, अर्थशास्त्र परिभाषा, साक्रेटिसाचें चरित्र, रासेलस यांचें भाषांतर, वगैरे ग्रंथ कृष्णशास्त्री यांनीं लिहिले. याशिवाय पद्यरत्नावली नामक कविताग्रंथ शास्त्रीबुवांनीं लिहिला असून तो फार मनोरम आहे. कृष्णशास्त्री यांचे बहुतेक ग्रंथ भाषांतरस्वरूपाचे आहेत. त्यांची भाषा, शुद्ध, सोपी, खुबीदार व गोड अशी आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे सन १८७८ सालीं वारले. विष्णुशास्त्री यांनीं पुढें कित्येक लौकिक कृत्यें हातीं घेतलीं त्याची थोडीबहुत सामुग्री आपल्या ग्रंथरचनेनें, विचारानें व कृतीनेंही न जाणतांच कृष्णशास्त्री यांनीं करून दिली, यांत शंका नाहीं.

## कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर.

आमचे चरित्रनायक विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म ता. २० मे १८५० रोजीं पुणें येथें झाला. हे कृष्णशास्त्री यांचे ज्येष्ठ चिरंजीव होत. त्यांचें लालनपालन त्यांचे आजोबा हरीपंत व आजीबाई भागिरथीमामी ह्याच करीत असत. विष्णुशास्त्री यांचे मनावर धर्म, नीति, आचारविचार यांचे संबंधानें चांगले संस्कार लागण्यास हींच आजा-आजी पुष्कळ अंशीं कारणीभूत झालीं.

विष्णुशास्त्री हे सहा सात वर्षांचे होईपर्यंत घरींच आजोबाजवळ उजळणी व साधारण लिहिण्यावाचण्यास शिकले. यानंतर बुधवारचे वाड्यांत इनफंटस्कूल नामक शाळेंत जाऊं लागले. सदाशिव पेठेंतील नागनाथाचे वाड्यांत असलेल्या इंग्रजी-मराठी शाळेंत वर्ष सवावर्ष त्यांनीं शिक्षण घेतलें. सन १८५९ सालीं विष्णुशास्त्री यांचें व्रतबंधन विश्रामबागेच्या वाड्यानजीक कर्व्यांचे वाड्यांत मोठे समारंभानें झालें. शास्त्रीबुवांचे आजोबा हरीपंत मामा हे जुन्या समजुतीचे असल्यामुळें त्यांनीं शास्त्रीबुवांना घरीं संध्या, पूजा वगैरे ब्रह्मकर्म पढविण्यास सुरवात केली. मोडी अक्षर, मोडी वाचन, तोंडचे हिशेब हींच काय तीं शिक्षणाचीं मुख्य अंगें अशी हरीपंतमामांची समजूत असल्या-

मुळे इंग्रजी—मराठी शाळेतून काढून एका नामांकित गावठी शाळेत त्यांनीं विष्णुशास्त्री यांना घातले. ती शाळा विश्रामबागेच्या वाड्या-शेजारीं आबासाहेब पटवर्धन यांचे माडीवर असे. या शाळेत विष्णु-शास्त्री सुमारें १ वर्ष होते. नंतर त्यांस त्यांचे वडिलांनी पुनः इंग्रजी शाळेत घातलें. या शाळेतून १८६१ सालीं विष्णुशास्त्री हे पूना हाय-स्कुलांत गेले. तेथें ते प्रथम जुनियर ४ थ्या वर्गांत बसले. सन १८६५ अखेर विष्णुशास्त्री हे मॅट्रिकची परीक्षा पास झाले. शास्त्रीबुवा हे हायस्कुलांत शिकत असतांना त्यांची वागणूक चांगली, अभ्यासी, नियमित, गरीब, निबोली अशी असे. शास्त्रीबुवांची घरांतील वागणूक अशीच असे. खाण्यापिण्याचे किंवा पोशाकाचे किंवा कोणत्याही बाबतींत त्यांची तक्रार म्हणून नसावयाची. विष्णुशास्त्री यांचे चुलते सितारामपंत, धाकटे बंधु लक्ष्मणराव, चुलत चुलत बंधु विनायकराव व माधवराव व मातुल काशिनाथपंत यांच्याशीं शास्त्रीबुवांचा लहान-पणीं बराच निकट संबंध आला. या छोटेखानी मंडळीचे खेळ, त्यांचीं भांडणें, त्यांचे द्वेषमत्सर वगैरेंचा शास्त्रीबुवांचे आयुष्यक्रमावर बराच परिणाम झाला, यांत शंका नाहीं. या सर्व मंडळींत शास्त्रीबुवांचाच अभ्यास चांगला होत चालला व ते क्रमाक्रमानें एकामागून एक वरचे वर्गांत चढत चालले हें पाहून बाकीच्या मंडळींसही आपण असेंच करावें, अशी ईर्ष्या उत्पन्न होई. कृष्णशास्त्री हेही विष्णुशास्त्री यांस मधून मधून शिकवीत असत. सन १८६५ सालचे सप्टेंबरचे १० वे तारखेस विष्णुशास्त्री यांचे आजे हरिपंतमामा हे वारले. या वेळीं त्यांचें वय ७५ वर्षांचें होतें. नातवाचा विवाह झालेला आपले डोळ्यानीं पाहावा ही आजोबांची मोठी इच्छा होती, परंतु हा योग घडून आला नाहीं. ते वारल्यावर तीनच महिन्यांनीं विष्णुशास्त्री यांचें लग्न मोठ्या थाटानें रा. नारायण भिकाजी गोगटे यांची कन्या व रा. बा. विष्णु मोरेश्वर भिडे यांची भाची काशीबाई हिजबरोबर झालें.

## उच्च शिक्षण.

विष्णुशास्त्री मॅट्रीक्युलेशनची परीक्षा पास झाल्यावर १८६६

सालचे आरंभीं म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षीं पुढील अभ्यास करण्यास जाऊं लागले. ह्या वेळीं प्रिन्सिपालचे जागी प्रसिद्ध विद्वान् मि. वर्डस्वर्थ साहेब असून मि. ऑस्केन हॅम, डॉ. किलहार्न, कै. केरोपंत नाना छत्रे हे प्रोफेसर होते, शिवाय शंकर नारायण पंडित व आबाजी विष्णु काथवटे हे फेलो असून अनंतशास्त्री पेंढारकर म्हणून एक शास्त्री होते. मि. वर्डस्वर्थ साहेबांची विद्वत्ता, डॉ किलहार्न साहेबांचें चोख शिकवणें, केरोपंत नाना यांची गणित विषय शिकविण्याची सोपी व मनोरंजन करणारी पद्धत, व त्यांचा बहुश्रुत पणा, अनंतशास्त्री पेंढारकर यांचीं सुभाषितांनीं व आख्यायिकांनीं भरलेलीं व्याख्यानें या सर्वांचा फायदा विष्णुशास्त्री यांनीं अत्यंत कसोशीनें करून घेतला. कॉलेजमध्ये विष्णुशास्त्री यांचा विद्याभ्यास इतर विद्यार्थ्यांप्रमाणेंच चालला होता. इंग्रजी, संस्कृत, इतिहास वगैरे विषयांत त्यांनीं चांगले प्रावीण्य संपादन केलें. कॉलेजांत गेल्या-पासून त्यांना एक जुनियर स्कॉलरशीप व वयांडीची मराठी स्कॉलर-शिप ह्या मिळत होत्या. गणिताकडे शास्त्रीबोवांचें बरेंच दुर्लक्ष होतें. ह्यामुळें लिटिलगो परीक्षेस तें गेलें असतां नापास झाले. १८६८ सालीं डेक्कनकॉलेजची इमारत पूर्ण होऊन बानवडीहून कॉलेज तेथें गेलें. परीक्षेत नापास झाल्यामुळें वर्षभर विष्णुशास्त्री हे थोडे नाउमेद होते. परीक्षेच्या ठरीव विषयाखेरीज स्कॉटच्या कादंबऱ्या, राजतरंगिणी वगैरे पुस्तकांच्या वाचनाकडे त्यांचें अधिक लक्ष असल्यामुळें या सालच्या प्रिलिमिनरी परीक्षेंत लॉजिकमध्यें ते नापास झाले; तथापि वर्डस्वर्थ साहेबानें विष्णुशास्त्री यांना फार्म दिला व या वर्षाअखेर म्हणजे १८६८ सालीं विष्णुशास्त्री लिटिल-गोच्या परीक्षेंत पास झाले. आतां शास्त्रीबोवा बी. ए. चा अभ्यास करूं लागले. बी. ए. च्या वर्गांत एक वर्षभर जास्त राहून चांगला अभ्यास करून मग डिग्रीची परीक्षा द्यावयाची असा साधारणपणें संपन्न असलेल्या साहाध्यायांनीं केलेला बेत विष्णुशास्त्री यांस पसंत पडला. एक वर्ष मुक्काम केल्यानें त्यांच्या हौसेप्रमाणें त्यांस परीक्षे-

खेरीज अवांतर पुस्तकें वाचण्यास चांगलें फावलें. त्यांचा वाचनाचा भर संस्कृत, मराठी व इंग्रजी ग्रंथ यावर फार असे. त्याच वेळीं कादंबरी, वासवदत्ता, राजतरंगिणी व बहुतेक मोठमोठीं काव्यें व नाटकें तसेंच मराठींतील मोरोपंतांची बहुतेक प्रकरणें, शिवाय मुक्तेश्वर व वामन यांचीं सर्व काव्येतिहाससंग्रहांत आलेलीं काव्येंही, त्यांनीं वाचलीं. तसेंच इंग्रजींतील भाषाज्ञान व इतिहास या विषयांवरील बरेच नामांकित ग्रंथ त्यांनी चाळून पाळूनवाचले. शास्त्रीबोवांच्या या वाचनामुळें त्यांचे अभ्यासाकडील लक्ष अर्थातच कमी झालें. बी. ए. च्या वर्गांत त्यांनीं दोन वर्षें काढलीं. या दोन्ही वर्षांत इंग्रजींतील व संस्कृतांतील प्रावीण्यतेमुळें सिनियर स्कॉलरशीप मिळाली असून शिवाय मराठीची व संस्कृतच्याही अशाच स्कॉलरशिपा मिळाल्या होत्या. परंतु परीक्षेच्या ठरीव विषयांची व्हावी तशी तयारी त्याच्या हातून न झाल्यामुळें १८७० सालच्या अखेरीस ते परीक्षेंत नापास झाले. यानंतर मात्र त्यांनीं कॉलेजला रामराम ठोकला व परीक्षेचा अभ्यास ते घरीं करूं लागले. त्यांचा बहुतेक अभ्यास झालाच होता. कांहीं थोडे विषय कच्चे होते ते कायते तयार करावयाचे होते. या वर्षांत विष्णुशास्त्री यांनीं कै० बाबा गोखले यांचे खाजगी इंग्रजी शाळेंत शिकविण्याचेंही पत्करलें होतें. सकाळीं बाबांच्या शिकविण्याचें काम करून दुपारी बी. ए. च्या परीक्षेचा अभ्यास ते करीत. तथापि पहिल्यापासून त्यांना गणिताचा जो कंटाळा असे तो कायमच होता. शेवटीं नाईलाज होऊन ते दुपारचे वेळीं शेजारीच त्यांचे स्नेही कै० गणेश परशुराम जोशी ह्यांच्या घरीं 'स्टयाटिक्स' समजावून घेण्याकरितां जात. सरतेशेवटीं जेमतेम करून या वर्षअखेर ते एकदाचे डिग्रीच्या परीक्षेंत पास झाले.

## अध्यापन, ग्रंथलेखन व लोकसेवा.

कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर हे बी. ए. चा अभ्यास घरी करूं लागले त्या वेळेपासूनच त्यांनीं शाळेंत शिकविण्याचें काम पतकरून

एका दृष्टीनें लोकसेवा करण्याचा आरंभ केला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. शाळेचे हेडमास्तर कै० बाबा गोखले हे होते. बाकीचे असिस्टंट बहुतेक उपरेच होते. बाबा गोखले ह्यांचे इंग्रजी अध्ययन चांगलें असून इंग्रजी शिकविण्यांतही त्यांचा हात खंडा असे. पुष्कळ मुलें बाबांचे इंग्लिशविषयींच भुकेली असून बाकीच्या मास्तरांचें शिकविणें किंवा बाकीचे विषय शाळेंत शिकणें यासंबंधानें तीं बहुतेक बेपर्वाच असत. शास्त्रीबोवांना शिकविण्याची हौस मोठी, त्यांचें शिकवणें पद्धतशीर होतें. परंतु वर्गांतील कडक शिस्त व कठोर शब्दांचा अमल हीं शिक्षणकलेंतील कांहीं अंगें शास्त्री-बोवांचे अंगीं नसल्यामुळें शास्त्रीबोवांच्या विद्वत्तेचा विद्यार्थ्यांस जितका फायदा व्हावयास पाहिजे होता तितका आला नाहीं. शास्त्रीबोवांना शिकविण्याची जशी हौस होती त्याचप्रमाणें वक्तृत्वोत्तेजक सभा डेक्कन कॉलेज ग्यादरिंग व डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे नाटक प्रयोग वगैरे सामाजिक परस्पर प्रेम वृद्धिंगत करणाऱ्या समारंभा-तून शास्त्रीबोवा मोठ्या उत्साहानें भाग घेत असत. वक्तृत्वोत्तेजक सभेंत एक नियमित श्रोता यापेक्षां त्यांचा जास्त संबंध नसे. कॉलेज ग्यादरिंगला ते हरहमेश जात असत, पांचपंचवीस लोक जमून कांहीं चालत असेल तेथें हे गेल्यावांचून राहात नसत. तथापि त्यांचे निबोलेपणा व सभाभीरुपणा मुळें काय होईल ते दुरुन पहावें व ऐकावें यापेक्षां जास्त भाग ते या कामांत घेत नसत. नाटक प्रयो-गांत मात्र भाग घेण्यास ते उत्सुक असत. जात्या निबोल्या व सभाभीरु स्वभावाच्या शास्त्रीबोवांना नाटकांत काम करणें कसें आवडत असे हें मोठें गूढ आहे; परंतु नाट्य हा निसर्गत:च असा विषय आहे कीं, त्या ठिकाणी मनुष्याची स्वाभाविक वृत्ति बाहेर प्रगट झाल्याशिवाय राहत नाहीं. शास्त्रीबोवा जात्या निबोले असले तरी हंसत खेळत चार मंडळींत गप्पासप्पा ठोकीत बसावें ही गोष्ट जरी त्यांचे वर्तनांत स्पष्ट दिसून आली नाहीं तरी नाटकांत प्रत्यक्ष काम करण्याचें त्यांनीं पतकरलें व आपली भूमिका उत्कृष्टपणें त्यांनीं रंगवून

दाखविली. त्या वेळीं शास्त्रीबोवांचें अंतःकरण कसें उत्साहपूर्ण व उल्हासित होतें ही गोष्ट लोकांचे नजरेस आल्यावांचून राहिली नाहीं. थ्यादरिंगमध्यें झालेल्या वेणीसंहाराच्या नाटकप्रयोगांत शास्त्रीबोवांच्याकडे धर्मराजाची भूमिका होती. पांचव्या अंकांत धर्मराजा अग्निप्रवेश करण्याची तयारी करून पितृतर्पण करितो त्या वेळीं विष्णुशास्त्री यांना, समोर आपले वडील कृष्णशास्त्री प्रेक्षकजनांत बसले असतांना त्यांचेपुढें हा पितृतर्पण करीत असतांना पाहून कांहीं ओळखीच्या मंडळींनीं हशा पिकविला !

डिग्रीवांचून लोकांत फारसी प्रतिष्ठा नाहीं असें शास्त्रीबोवांना वाटत असे. त्यामुळें बी. ए. झाल्यावर त्यांना बरेंच हलकें वाटलें. आतां आपणाला आवडेल त्या विषयाचें हवें तितकें अध्ययन करण्यास व देशभाषेंत ग्रंथरचना करण्यास अवकाश पुष्कळ सांपडेल, म्हणून त्यांस आनंद झाला. कृष्णशास्त्री यांना आपले मुलानें मुनसफीचा अभ्यास करून पैसा व नांवलौकिक मिळवावा असें वाटत असे. परंतु विष्णुशास्त्री यांचे मनांत वकिलीचे धंद्याविषयीं व एकंदर कायद्याचे अभ्यासाविषयीं अप्रीति असे. मराठी भाषेविषयीं नवीन विद्वान लोकांमध्यें जी अनास्था दृष्टीस पडते ती दूर करावी व देशी भाषेंत ग्रंथरचना करून तिला प्रगल्भ दशेस आणावें ही शास्त्रीबोवांची मनापासून इच्छा होती, व या इच्छेप्रमाणें आपल्या आयुष्यक्रमाचें धोरणही त्यांनीं ठरविलें होतें. १८६५ पासून मराठी शालापत्रकाचें काम कृष्णशास्त्री यांजकडे होतें. तीन साडेतीन वर्षांनंतर कृष्णशास्त्री यांनीं आपले चिरंजीव विष्णुशास्त्री यांजवरच हें काम सोपविलें. पुढें शास्त्रीबुवांनीं 'संस्कृत कवि' नामक एक टीकाग्रंथ त्यांनीं लिहिला. यांत कालिदास, बाण, सुबंधु, व दंडी या कवींची मिळेल तितकी माहिती देऊन नंतर त्यांचें काव्यपरीक्षण केलें आहे. शास्त्रीबोवा या रीतीनें भाषादेवीची आराधना करीत असतां १८७२ सालीं सरकारी नोकरी त्यांजकडे चालून आली. विद्याखात्याचे डायरेक्टर मि. चॉटफील्ड यांचा व कृष्णशास्त्री यांचा अतिशय लोभ होता. तेव्हां चॉटफील्ड

यांनीं कृष्णशास्त्री यांच्या चिरंजीवांना कोणत्याही प्रकारची अर्जविनंति नसतांही पुढें हायस्कुलांत स्वतः होऊन जागा दिली. पूना हायस्कूलचे त्या वेळचे हेडमास्तर कै० महादेव मोरेश्वर कुंटे हे होते. रा. कुंटे व विष्णुशास्त्री यांचें कधींच जमलें नाहीं; तथापि मि. चॅटफील्ड साहेब यांचा लोभ असल्यामुळें शास्त्रीबोवांना या शाळेंत लवकर बढतीही मिळाली.

## निबंधमाला.

१८७३ सालच्या खेरीज नाताळचे सुटींत विष्णुशास्त्री व त्यांचे स्नेही रा. किर्लोस्कर, जांभेकर व आगाशे हे आळंदीस सहज मौजेनें म्हणून गेले होते. आळंदीहून परत येत असतां शास्त्रीबोवांनीं एकादे नवीन मासिक कां काढूं नये त्यासंबंधीं बरीच चर्चा झाली व मासिक काढण्याची कल्पनाही त्यांस पसंत पडली. १८७४ च्या आरंभापासून निबंधमाला मासिक काढण्याचा त्यांनीं निश्चय केला, व त्याबद्दल ज्ञानप्रकाश या वर्तमानपत्रांत जाहिरातही दिली. आळंदीच्या वाटेंत शास्त्रीबोवा व त्यांची मंडळी यांना मराठी भाषेंत स्वतंत्र तऱ्हेनें विचार करण्याची स्फूर्ति झाली हा योगायोग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. गीतेवर मराठींत टीका करून ब्रह्मविद्येचा मराठींत सुकाळ करणाऱ्या ज्ञानेश्वरमहाराजांनीं मराठींत राजकीय, सामाजिक, बौद्धिक वगैरे विषयांवर स्वतंत्र विचाराचा ओघ निर्माण करण्याकरितां व महाराष्ट्रांत स्वाभिमानाचें, स्वदेशाच्या इतिहासाचें लोपलेलें ज्ञान प्रगट करण्याकरितां विष्णुशास्त्री चिपळूणकर त्यांच्यासारख्यांची भूमिका शोधून काढली हें योग्य झालें असें कोणता महाराष्ट्रीय म्हणणार नाहीं! निबंधमालेसंबंधानें शास्त्रीबोवांच्या या लहानशा चरित्रांत जास्त काय लिहावें? निबंधमालेची भाषाशैली अंतःकरण भेदून नेणारी, तींतील शब्दरचना, स्वदेशाभिमान, स्वावलंबन, आपल्या पूर्वजाविषयींची उदात्त भक्ति वगैरे गुणांचा अंकुर उत्पन्न करण्याची तिची शक्ति, देशाच्या हल्लींच्या निकृष्ट अवस्थेत आशा उत्पन्न करून देशकार्याची स्फूर्ति उत्पन्न करण्याचें तिच्या अंगीं

असलेलें ओझें ह्या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे. " I am the Shivaji of marathi language who had not his equal to precede or succeed him. " असे जे शास्त्रीबोवांनीं आपल्या स्वतःविषयींचे स्वाभिमानाचे उद्गार काढले आहेत ते अत्यंत सार्थ आहेत असे कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. मराठी भाषेची सांप्रतची स्थिति, विद्वत्व, कवित्व वक्तृत्व, इतिहास, लोकभ्रम, इंग्रजीभाषा, डॉ. जॉनसन, मोरोपंतांची कविता, आमच्या देशाची सांप्रतची स्थिति वगैरे अनेक महत्वाचे विषय निबंधमालेंत आले आहेत. शास्त्रीबोवा जन्मले कधीं ते शिकले कोठपर्यंत त्यांनीं सरकारी नोकरी कोठें धरली, त्यांचा स्वभाव कसा होता ते वारले केव्हां वगैरे त्रोटक माहिती याचा तपशील या चरित्रांत सांपडेल. परंतु खरे शास्त्रीबोवा कसे होते, त्यांचें अंतःकरण कोणत्या उदात्त विचारानें भरलेलें होतें कोणता उपदेश त्यांनीं आपल्या देशबांधवांना केला ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष त्यांची निबंधमाला वाचल्या-खेरीज कळणार नाहीं.

## स्वतंत्र उद्योग.

दुसऱ्याच्या हिताहिताचा संबंध ज्यांत नसेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल शास्त्रीबुवा कोणाचाही सल्ला घेत नसत. स्वाभिमान, देशाभिमान, स्वमताभिमान वगैरे उदात्त गुण शास्त्रीबुवा यांचें अंगीं होते व आपली ही स्वतंत्र वृत्ति कायम ठेवण्याकरितां लागणारी चिकाटीहीं त्यांच्या आंगीं होती. इंग्लंड वगैरे देशांत केवळ लोकाश्रयावरच अवलंबून राहावयाचें, स्वतंत्र मताचा प्रसार करण्याचे बाबतींत कोणाचीही भीड ठेवावयाची नाहीं, या गोष्टी पाश्चात्य ग्रंथकारांना जर साधतात तर आपणही तसेंच वागणार. सरकारी अधिकाऱ्यास राग आला व त्यांनीं नोकरी काढून घेतली तरी काय होणार आहे ? नवीन पुस्तकें लिहून किंवा स्वतंत्र शाळा काढून चरितार्थ चालवितां येईल

रांच पंचवीस रुपये कमी का जास्त एवढेंच काय तें. अशा अडाड्यांच्या विचारानें शास्त्रीबुवांनीं निबंधमालेचें काम चालविलें होतें. निबंधमालेंतील इंग्रजी भाषेवरील तिसऱ्या निबंधांत युरोपियन इतिहासकारांच्या कांहीं महासिद्धांतांचें खंडण शास्त्रीबुवांनीं केलें. पूर्वेकडील राष्ट्रें म्हणजे नुसती ऐषआरामांत मग्न, भपकेदार व नीतीनें फारच हलक्या दर्जाचीं, असें पश्चात इतिहासकारांनीं केलेले सिद्धांत शास्त्रीबुवांनीं सप्रमाण व निर्भिडपणें खोडून काढले. शास्त्रीबुवांच्या पायांतील रुपेरी बेडी तोडून टाकणारें एलिफंस प्रकरण याच लेखांतून उगम पावलें. इंग्रजाविरुद्ध किंवा इंग्रज ग्रंथकाराविरुद्ध लिहिणें म्हणजे केवढा राजद्रोह ! आणि असला राजद्रोह शाळेंतील एका मास्तरानें करावा हें सरकारी अधिकाऱ्यांना मग ते कितीही थोर मनाचे असले तरी कसें खपणार ! मि० चॅटफिल्ड यांचा व कृष्णशास्त्री यांचा फार दिवसाचा लोभ असला तरी तो या प्रसंगीं मावळून गेला व साहेबमजकुरांनीं शास्त्रीबुवांची बदली रत्नागिरीस केली. रत्नागिरीसारख्या दूरच्या ठिकाणीं बदली केल्यावर विष्णुशास्त्री यांची गुर्मी जिरेल व ते ताळ्यावर येतील अशी मि० चॅटफिल्ड यांची कल्पना; विष्णुशास्त्री असल्या धमकावणीला भीक घालणारे नव्हते. विष्णुशास्त्री रत्नागिरीस १८७७ सालीं गेले. तेथील मास्तरकीचा चार्ज त्यांनीं घेतला पण आपल्या निस्पृह विचारसरणीचा क्रम त्यांनीं तसाच चालू ठेवला रत्नागिरी हें स्थळ शास्त्रीबुवांना प्रथम प्रथम बरें वाटलें. हें खरें पण त्या ठिकाणींही सरकारी मास्तरकीच्या गुलामी वृत्तीचा कंटाळा येऊन या नोकरीचा राजीनामा देण्याचें त्यांनीं ठरविलें. सरकारी नोकरीचा राजीनामा देण्यापूर्वी सहा महिन्याची अर्धपगारावर रजा मे महिन्याचे सुट्टीसच लागून घेण्याचा विष्णुशास्त्री यांनीं आपले मनांत विचार केला व तेवढे अवकाशांत आपणास नोकरी सोडल्यानंतर जे उद्योग सुरू करावयाचे त्यांची त्यांनीं तयारी केली. सरकारी नोकरीशीं फारकत करण्यापूर्वी स्वतंत्र रीतीनें निर्वाह चालविण्याचीं तीन साधनें निबंधमाला, चित्रशाळा व किताबखाना हीं तयार करून ठेविलीं

होतीं. सरकारी नोकरीचा आपण राजीनामा देणार हें त्यांनीं पुण्यास आल्यावर सुद्धां कोणाला कळविलें नाहीं. शेवटीं १८७९ सप्टेंबर अखेर त्यांनीं नोकरीचा राजीनामा रत्नागिरीस हायस्कूलचे हेडमास्तर रा० नारायण विनायक साठे यांजकडे पाठवून दिला. सरकारी नोकरीचे एका पारड्यांत बडा तनखा, छोटें काम, अनेक प्रकारच्या रजा पेन्शन वगैरे शारीरसुखाचें साधनांची रेलचेल व दुसरें पारड्यांत त्याच्या मोबदला स्वाभिमान, स्वमताभिमान व स्वदेशाभिमान इ वृत्तींची झालेली रागोळी हें पाहून शास्त्रीबुवासारख्या मनुष्यास सरकारी नोकरीचा कंटाळा आला असल्यास त्यांत नवल नाहीं शास्त्रीबोवांच्या वेळीं सार्वजनिक चळवळी फारशा उद्भवल्या नव्हत्य तथापि आपल्या स्वतंत्रमतप्रतिपादनास सरकारी नोकरीची बिडं आड येते असें पाहिल्यावर ती ताडकन तोडून टाकून मोकळे होणा स्वतंत्रता देवीचे भक्त देशांत जेव्हां शेकडोंनीं निर्माण होतील तो सुदीन होय.

शास्त्रीबोवांनीं आपल्या उत्कट आत्मविश्वासाच्या बळावर स्वतं उद्योग काढण्याचें ठरविलें व परमेश्वराच्या कृपेनें त्यांना कांहीं कमी पडलें नाहीं. चित्रशाळा, किताबखाना, याप्रमाणें एक चित्रांच कारखाना व पुस्तकांचें दुकान चालविण्यास रा. बाळकृष्ण वासुदे जोशी, रा. शाळिग्राम व रा. वासुदेव गणेश जोशी ( हल्लीं चित्रशाळेचे मालक ) वगैरे उत्साही, चिकाटीचे तरुण त्यांना मिळा व त्यांच्या मताप्रमाणें या कारखान्यांचीं कामें चालूं लागलीं.

## न्यूइंग्लिशस्कूल.

शास्त्रीबोवांचा या पुढचा उद्योग म्हणजे न्यूइंग्लिशस्कूल हो विद्यार्थ्यांचे मनांत स्वदेशाभिमान जागृत व्हावा, सरकारी नोकरीं राहून ख्यालीं खुशालींत दिवस काढण्यापेक्षां देशकार्याकरितां स्व सुखावर पाणी सोडून स्वतंत्रबाण्यानें राहणार तरुण निर्माण करा व त्यांनीं निबंधमालेंत प्रगट केलेल्या विचारांचा फैलाव देशांत करू

आजन्म देशकार्य करीत रहावें अशा उद्देशानें शास्त्रीबोवांनीं न्यूइंग्लिश-स्कूल स्थापन केलें. ता. १ जानेवारी १८८० सालीं मोरोबादादांच्या वाड्यांत हें स्कूल सुरू करण्यांत आलें. पहिल्या दिवशींच १५० मुलांचीं नांवें पटावर नोंदवून शाळेच्या कामांस सुरवात झाली. या शाळेंत या वेळीं मुख्य असे शिक्षक तीनच होते. ते विष्णुशास्त्री, लो० टिळक व माधवराव नामजोशी होते. ह्या देशभक्त त्रयीनें ही शाळा प्रथम सुरवात केली. या संस्थेचे ध्येय पुढें जरी कायम टिकले नाहीं, पूर्वीच्या धोरणाप्रमाणें या शाळेच्या व यापुढें निघालेल्या कॉलेजच्या चालकाशीं मतभेद होऊन लोकमान्य टिळकांनीं जरी या संस्था सोडल्या तरी त्या अद्याप जिवंत असून पुढें मागें लवकरच शास्त्रीबोवा व लो० टिळक यांच्या हेतूप्रमाणें या संस्थांस योग्य ते राष्ट्रीयस्वरूप मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. सन १८८०च्या अखेरीस गोपाळ गणेश आगरकर एम. ए. हे न्यूइंग्लिश-स्कुलास येऊन मिळाले. आतां न्यूइंग्लिशस्कुलमध्यें नवीच दमाची पुष्कळ मंडळी जमली होती. या मंडळींना शाळेंत शिकवूनही बरीच फुरसत रहात असल्यामुळें शाळेंत काम करूनही एकादा छापखाना काढून स्वतंत्र वर्तमानपत्र चालू करावें व आपल्या स्वतंत्र मताचा प्रसार करून लोकशिक्षणाचें काम करावें असें त्यांस वाटूं लागलें. शास्त्रीबोवाही एक नवीन छापखाना काढण्याच्या विचारांत होते. तेव्हां अर्थातच या सर्व मंडळींनीं भागीनें भांडवल उभें करून आर्यभूषण छापखान्याची स्थापना केली. छापखान्याची योजना झाल्यावर वर्तमानपत्र काढावयाचें तें कोणत्या धर्तीवर काढावयाचें यासंबंधानें विचार झाला व या विचाराचें दृश्यफल म्हणजे.

## केसरी व मराठा

हीं पत्रें होत. या पत्रांच्या संबंधानें नोटिशी वाटण्यांत आल्या. त्यांत विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर, आपटे, डॉ. गर्दे वगैरे आठ दहा गृहस्थांच्या सह्या होत्या. याप्रमाणें १८८१ सालीं केसरी व

मराठा ही पत्रें सुरू झालीं. केसरीचें काम रा. आगरकर व मराठ्याचें काम लो. टिळक यांजकडे होतें. तथापि केसरीचा आग्रलेख विष्णुशास्त्री यांचा असे. मराठ्यांत अग्रलेख वगैरे त्यांनीं कधीं लिहिला नाहीं. शास्त्रीबोवांना वर्तमानपत्रें वाचण्याचा स्वभावतःच कंटाळा असल्यामुळें प्रचलित राजकीय विषयावर त्यांचे अग्रलेख नसत. विशेषतः बौद्धिक व सामाजिक विषयावर त्यांचे लेख असायचे; व तेही वर्तमानपत्रास शोभण्यासारखे नसून मासिक पुस्तकास शोभण्याजोगे असावयाचे. निबंधमालेप्रमाणें शास्त्रीबोवांचे लेखही प्रत्यक्षच वाचल्याशिवाय शास्त्रीबोवांच्या खऱ्या अंतःकरणाची ओळख पटावयाची नाहीं. यापेक्षां जास्त लिहिण्यास आज आमच्यापाशीं जागाच नाहीं.

याच सालचे सुमारास शास्त्रीबोवांच्या पत्नी नेहमीं आजारी पडतात व त्यांना संततीचा योग नाहीं, असें पाहून विष्णुशास्त्री यांनीं दुसरें लग्न करावें अशी गोष्ट शास्त्रीबोवांच्या मातोश्रींनीं त्यांच्या कानावर घातली, त्या वेळीं शास्त्रीबोवांनीं जरासे रागावूनच आपली या गोष्टीस संमति नसल्याचें सांगितलें.

## अंत.

आतांपर्यंत विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांतील कालानुक्रमानें त्रोटक वृत्त दिलें. आतां " मरणं प्रकृतिः शरीरिणाम् " या निसर्गाच्या सिद्धांताप्रमाणेच गतकालच्या थोर पुरुषांच्या चरित्रलेखकास करावें लागणारें अपरिहार्य व शेवटचें काम आतां आम्ही करतों. विष्णुशास्त्री यांच्यासारख्या थोर पुरुषाचें आयुष्य अगदीं ऐन तारुण्याच्या भरांत म्हणजे बत्तिसाव्या वर्षी संपलें हें सांगण्याची पाळी यावी यासारखें दुर्दैव तें कोणतें ? १८८२ जानेवारींत शास्त्रीबोवांना आपल्या सर्व कुटुंबाचा फोटो काढून घ्यावा अशी इच्छा उत्पन्न झाली. त्याचप्रमाणें एका पोर्तुगीज फोटोग्राफरला घरीं बोलावून त्यांनीं बायकामंडळीचा फोटो काढवून घेतला. दुसरे दिवशीं पुरुष मंडळींचा फोटो काढण्याकरितां सर्व मंडळी फोटोग्राफराच्या घरीं गेली. मंडळींच्या फोटोच्या दोन प्रति घेणें झाल्यावर यांचा एकट्याचाच ते उभे आहेत असा

निराळाच फोटो घ्यावा अशी मंडळींनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून हा नवीन फोटो घेऊं देण्यास ते उभे राहिले असतां उन्हाची तिरीप त्यांना लागली व एकाएकी घेरी येऊन ते एकदम भुईवर पडले. शास्त्रीबोवांचें अखेरचें दुखणें या फोटोचें निमित्त करून पुढें झालें व या दिवसापासून त्यांना जो बारीक ताप येऊ लागला तोच शेवटीं वाढत चालला. या दुखण्यांत शास्त्री-बोवांकडून व आप्तेष्टांकडून योग्य उपचार करण्याच्या बाबतींत थोडी हेळसांडच झाली. डॉक्टर की वैद्य करताकरतां शेवटीं रा. गणेशबुवा साकुरडीकर वैद्य यांचें औषध घेण्यास शास्त्रीबोवांनीं सुरवात केली. पण एके दिवशीं कलिंगड्याची एक लहानशी फोड खाल्याचें निमित्त होऊन त्यांची प्रकृति बेताल झाली. व एकाएकीं ताप १०७ डिग्रीपर्यंत चढून त्यांना वातविकारही झाला. साकुरडीकर वैद्य प्रकृति पाहून काढा देऊन गेले व शास्त्रीबोवांचा अंत आजच होणार आहे अशी कोणाची कल्पना नसल्याकारणानें त्यांच्या शुश्रूषेंत असणारी मंडळीं कांहीं जागत व कांहीं निजत असें चाललें होतें, पण शास्त्री-बुवांना एकाएकीं पांच वाजण्याच्या सुमारास घोर लागला व डॉक्टर, वैद्य वगैरे येण्यापूर्वीच मराठी भाषेचा हा शिवाजी महाराष्ट्रास पोरेक करून स्वर्गास गेला. हा दिवस गुरुवार ता. १७ मार्च १८८२ हा होता. शास्त्रीबुवांच्या मृत्यूचा हा दिवस आठवला म्हणजे अद्यापीही महाराष्ट्राचें अंतःकरण कळवळून जातें. मग त्या वेळच्या महाराष्ट्रीय देशभक्तांची मनस्थिति काय झाली असेल या गोष्टीचें वर्णन करणें आमच्या सामर्थ्याबाहेरचें आहे !

# कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या वेळची स्थिति.

## लो. टिळक यांनीं १८९१ सालीं वाचलेला निबंध

सन १८१८ सालीं इंग्रजांचा अमल महाराष्ट्रांत बसल्यावर पेशवाईत दक्षिणेकरितां जी रक्कम खर्च होत होती ती तशीच इंग्रज-सरकारनें चालू ठेवली. पण पुढें दक्षिणेचा ब्राह्मण कमी कमी होत जाऊन जसजशी दक्षिणाफंडाची रक्कम शिल्लक पडूं लागली तसतसा फंडाचा विनियोग विश्रामबाग संस्कृत कॉलेज काढण्याकडे लवकरच करण्यांत आला. या कॉलेजांत सन १८३७ सालापर्यंत केवळ संस्कृतच शिकवीत असत. पण पुढें त्याच्या अभ्यासक्रमांत इंग्रजीचा समावेश होऊन वीस वर्षांनीं म्हणजे १८५७ सालीं त्याचें डेकन कॉलेज बनलें. युनिव्हर्सिटीचा कायदा सन १८५७ सालीं पास झालेला आहे व त्या कायद्याप्रमाणें डेक्कनकॉलेज हें सन १८६० सालीं नव्या युनिव्हर्सिटींत सामील करण्यांत आलें. सन १८६० पासून १८७४ पर्यंत या कॉलेजांतून बी. ए. किंवा एम. ए. झाले त्यांची संख्या ५०।६० च्या पलीकडे जाईल असें वाटत नाहीं. तथापि सन १८३७ सालीं सुरू झालेल्या इंग्रजी शिक्षणाचे २५।३० वर्षांत समाजावर जे परिणाम झाले ते इतके महत्वाचे आहेत कीं, त्यांची कल्पना डेक्कनकॉलेजांतील ग्रॅज्युएटांच्या संख्येनें किंवा एकदोन व्यक्तींच्या चरित्रांवरून नीटपणें लक्षांत येणें अशक्य आहे.

हरएक समाजांत समाजाचे आधारस्तंभ म्हणजे त्यांतील विद्वान, विचारी आणि संभावित गृहस्थ होत. कोणत्याहि समाजांत पुढारीपणा प्राप्त होण्यास विद्वत्तेची नेहमींच अपेक्षा असते असें

नाहीं. मानमान्यता, संपत्ति, कुल व वर्तन आणि साधारण समजूनदारपणा व व्यवहारचातुर्य इतके गुण कोणाच्या अंगीं असले म्हणजे तो अंगीं हिंमत असल्यास आपापल्या वर्गात पुढारीपणा घेऊं शकतो. पुणें शहरांत ब्राह्मणीराज्य असल्यामुळें अशा प्रकारचे पुरुष पेशवाईअखेर प्राय: जुन्या सरदार मंडळींतच दृष्टीस पडत असत, व कांहीं वर्षेपर्यंत नव्या सरकारनेंहि त्यांचा तशा प्रकारें बोज ठेवला होता. पण पुढें लवकरच या पुढाऱ्यांचीं नखें व दांत काढून घेतल्यानें ' पिंजऱ्यामध्यें वाघ सांपडे । बायकांमुळें मारिती खडे ' अशी त्यांची स्थिति झाली. नवीन राज्यपद्धतींत या जुन्या सरदार-मंडळीस देण्यासारखें कांहीं काम नव्हतें असें नाहीं. पण ' यथा राजा तथा प्रजा ' या न्यायानें नवीन तऱ्हेच्या इंग्रजी शिक्षणानें तयार झालेली मंडळीच हातीं धरणें राज्यकर्त्यांस अधिक सोयीस्कर वाटून ती तयार करण्याचे कारखाने ऊर्फ शाळा काढण्यास त्यांनीं सुरुवात केली. इंग्रजी राज्यापासून आम्हांस जे पुष्कळ लाभ झाले आहेत त्यांतच शिक्षणाची गणना प्रमुखत्वानें करण्याचा प्रघात आहे. पण विचार केला असतां आपणास असें आढळून येईल कीं, हें पाश्चिमात्य शिक्षण अगदीं एकअंगीं असून त्या शिक्षणाचा परिणामहि तसाच झाला. धर्म व नीति याच्याबद्दल इंग्रजी धर्तीवर काढलेल्या शाळांतून चकार शब्दहि काढावयाचा नाही अशी, धर्मौदासिन्याची आमच्या सरकारनें शपथ घेतल्यामुळें पहिल्यापासूनच रीत पडली होती. यामुळें इंग्रजी शाळांतून पहिल्या पहिल्याने जी मंडळी बाहेर पडली त्यांच्या मनाची स्थिति एक प्रकारें फारच भयंकर किंवा शोचनीय झालेली होती, स्वधर्माचें किंवा त्यांतील नीतितत्त्वाचें शिक्षण बिलकूल नाहीं आणि परधर्माचेंहि नाहीं. समजाच्या परंपरागत बंधनाबद्दल आदर असावयाचा तोहि नाहींसा झालेला आणि दोन बुकें झाल्याबरोबर बऱ्याच मोठ्या पगाराची जागा, त्या वेळीं मिळत असल्यामुळें अधिकारमदाचाहि बराच अंमल त्यांच्या मनावर बसलेला होता. युरोपांतील किंवा विलायतेंतील शाळांतून अशाच

तन्द्देचें शिक्षण मिळतें, पण स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची गोडी, वगैरे चांचल्यदोष घालविणाऱ्या अनेक गुणांच्या साहाय्यानें तें शिक्षण मनुष्यास बेहोष करीत नाहीं. आमच्याकडे या सर्व बंधनांचा अभाव असल्यामुळें त्या शिक्षणापासून स्वल्प ज्ञानानें संतुष्ट,. बेपर्वा, स्वहितापलीकडे लक्ष न देणारे आणि स्वत:सच विद्वान मानून इतर सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे असे नवे म्होरपे या कारखान्यांतून प्रथमतः तयार झाले. परंतु याहीपेक्षां विशेष दुर्दैवाची गोष्ट म्हटली म्हणजे या लोकांचा सरकारांतून त्या वेळीं जो मान होत असे तो होय. राज्यकारभाराच्या नवीन पद्धतीस इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची त्या वेळीं जरूर होती. यामुळें या अर्ध्याकच्च्या विद्वानांस मोठ्या नोकऱ्या मिळून अधिकारामुळें त्यांस समाजांत एक प्रकारचा मोठेपणा प्राप्त झाला. तात्पर्य, अव्वल पेशवाईंत कुलशील, पराक्रम, सदाचरण, संपत्ति वगैरे गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादन केलें होतें त्यांचे वंशज लवकरच भिकेस लागून त्यांचें स्थान समाजाच्या खालच्या वर्गांतील अर्धवट इंग्रजी शिकलेल्या या मंडळीस प्राप्त झालें. राज्यक्रांतीमुळें समाजाच्या पुढाऱ्यांत ही जी क्रांति झाली ती सामाजिकदृष्ट्या फार महत्वाची आहे. सन १८३७ पासून १८७४ पर्यंत म्हणजे सुमारें ३७ वर्षांत या नवीन पुढाऱ्यांच्या दोन किंवा तीन पिढ्या महाराष्ट्रांत झाल्या असें दिसून येतें. अगदीं पहिली पिढी म्हणजे कै. गोपाळराव हरि देशमुख यांच्या समकालीन किंवा पूर्वींच्या मंडळीची होय. त्यानंतरची पिढी म्हणजे कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर व केरुनाना छत्रे यांच्या वेळच्या मंडळींची आणि तिसरी पिढी कै. कुंटे व रानडे यांच्या वेळची होय. कै० कुंटे व रानडे या दोघांचाही अभ्यास पुण्यास झाला नव्हता. तथापि त्यांनीं आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षें येथें घालविलीं असल्यामुळें तत्कालीन पिढीचा उल्लेख त्यांच्याच नांवानें केला आहे. या तिन्ही पिढ्यांपूर्वीं विश्रामबाग पाठशाळेंतील कै. मोरशास्त्री साठे, त्रिंबकशास्त्री शाळिग्राम वगैरे

मंडळींकडे पुण्यांतील समाजाचें कांहीं वर्षें पुढारीपण होतें, पण ही मंडळी इंग्रजी शिकलेली नसल्यामुळें त्यांच्या कालाचा सध्या विचार करण्याची जरूर नाहीं. वर ज्या तीन पिढ्या सांगितल्या आहेत त्यांच्या संबंधाचा विचार कर्तव्य आहे, पण तत्पूर्वी एवढें सांगितलें पाहिजे कीं, त्यासंबंधानें मी जें कांहीं सांगणार आहें तें कोणाही विशेष व्यक्तीसंबंधानें नसून त्या त्या पिढीचें सामान्य वर्णन आहे.

वर सांगितलेल्या तीन पिढ्यांपैकीं पहिल्या पिढींतील लोकांस शाळेमध्यें जीं दहा पांच इंग्रजी पुस्तकें शिकवीत असत, त्यापलीकडे विद्येचा विशेषसा संस्कार झाल्याचें आढळून येत नाहीं, त्यांच्या-पैकीं कै. गोपाळराव हरी यांनींच काय तो थोडाबहुत विद्याव्यासंग शेवटपर्यंत कायम ठेविला होता. पण बाकी चुटपुटल्या ज्ञानाचेच अधि-कारी होते. इंग्रजी राज्यांत या मंडळीस नवीन मिळालेल्या अधिका-रानें हे बेपर्वा झालेले होते हें वर सांगितलेंच आहे. पण याखेरीज यांच्या अद्वातद्वा विचार—आचारांचा विशेषेंकरून पुढारी कुटुंबांच्या गृहस्थितीवर फारच वाईट परिणाम झालेला होता. सौम्य पण शिस्तवार गृहशिक्षणाचा व गृहस्थितीचा लहानपणीं मुलांच्या मनावर किती परिणाम होत असतो हें मीं येथें सांगावयास पाहिजे असें नाहीं; किंबहुना ज्या देशांतील पुढारी कुटुंबांतील गृहव्यवस्था विघड-लेली असते त्यांत चांगले पुरुष निपजणें कठीण आहे असें म्हटलें तरी चालेल. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे इंग्रजी शिक्षणपद्धतीचा आमच्या समाजावर पहिला वाईट परिणाम म्हटला म्हणजे त्यामुळें झालेली आमच्या पुढाऱ्यांच्या मनाची अव्यवस्थित वृत्ति आणि सदर वृत्ती-च्यायोगें बिघडलेली गृहव्यवस्था हा होय. पहिल्या पिढींतील लोकांस लहानपणीं तरी एक प्रकारचें जुन्या तऱ्हेचें गृहशिक्षण मिळालेलें होतें. पण दुसऱ्या व तिसऱ्या पिढींत त्याचाही लोप झालेला होता. या दुसऱ्या पिढींतील एका गृहस्थाचें व माझें कांहीं वर्षांपूर्वी भाषण झालें होतें, तेव्हां त्यानें मला असा प्रश्न विचारला होता कीं, ''कांहो, आम्ही आतां स्नानसंध्या करीत नाहीं खरें, पण आमच्या लहान-

पणीं आम्हांस कांहीं एक प्रकारचा जुना आळा असल्यामुळें आम्ही त्यावेळीं मेहनत करून आज कांहीं तरी उदयास आलों. पण आमच्या मुलांनीं एव्हांपासून सर्व निर्बंध सोडून दिले तर त्यांची पुढें वाट काय होणार ? " हा प्रश्न मोठा मार्मिक होता, परंतु गृहशिक्षणाचें व गृहव्यवस्थेचें तुरतें महत्व वळून उपयोग काय ? ज्या वेळीं ही गोष्ट त्या गृहस्थांस कळली तेव्हां तो बहुतेक उतारवयांत आला होता व पुढें लवकरच त्याचा अंत झाला, कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं मृत्युसमयीं काढलेले उद्गार विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत दिलेलेच आहेत. या बृहस्पतितुल्य विद्वानांच्या बुद्धिमत्तेबद्दल कोणाचाही पूज्यभाव असणें स्वाभाविक आहे; पण खाजगी वर्तनाच्या दृष्टीनें पाहतां यांजबद्दल तीच बुद्धि कोणाही निःपक्षपाती मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवेल असें मला वाटत नाहीं. इतर विद्वानांचीही स्थिति बहुतेक अशाच प्रकारची होती. मद्यपान, वेश्यागमन वगैरे दुर्गुण बहुतेक संभावित गणले जात असत, व मला तर असें आठवतें आहे कीं, त्या वेळच्या खासगी शाळेच्या एका मास्तरास सकाळची शाळा असतां शाळेंतील विद्यार्थी त्याच्या अंगवस्त्राच्या घरांतून कित्येकदां बोलावून आणीत असत ! अशा प्रकारच्या बिघडलेल्या वातावरणांत धर्मनिष्ठा, नीतिधैर्य किंवा सदाचरण यांचें बीजारोपण नवीन पिढीच्या मनांत कितपत होणें शक्य आहे याचा विचार करण्याचें काम मी आपणांकडेसच सोंपवितों. मुंबईंतील एका प्रसिद्ध पुढाऱ्याचें व माझें सुमारें वीस वर्षांपूर्वी या विषयावर बोलणें झालें होतें. तेव्हां त्यांनीं जे शब्द उच्चारले त्यांची अद्याप मला आठवण आहे, ते म्हणाले कीं, " They have made vice fashionable in Poona " आणि खरोखरच त्या वेळची पुण्याची स्थिति तशी होती. विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिति यांचा एकमेकाशीं जो नित्य संबंध असावा लागतो, व तो असल्याखेरीज राष्ट्रांतील विद्वान लोक पुढारीपणा घेऊन जोरानें राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहींत तो संबंधच इंग्रजी

शिक्षणानें पहिल्यानें तोडून टाकला, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. नीतिदृष्ट्या याचा काय परिणाम झाला हें वर सांगितलेंच आहे, पण त्याखेरीज इतर बाबतींतही अशा प्रकारच्या एकपक्षी शिक्षणापासून दुसरे अनेक वाईट परिणाम झाले. पाश्चिमात्य इंग्रजी विद्येनें दिपून जाऊन पहिल्या पिढीचे डोळे फिरले आणि आपल्या देशांतील सर्व कांहीं गोष्टी त्यांस वाईट दिसूं लागल्या असे म्हणण्याचा परिपाठ आहे, पण यांतील खरें बीज काय हें पाहिलें असतां मी वर सांगितलेल्या गोष्टींकडेच वळावें लागेल. आपण अशी कल्पना करूं कीं, कोणत्या एखाद्या नवीन राष्ट्रांतील लोकांस आमच्या संस्कृतांतील न्याय, गणित आणि काव्यें एवढ्यांचेंच शिक्षण दिलें व वेदान्त किंवा धर्मशास्त्र वगैरे विषयांवरील ग्रंथ त्यांच्या नजरेसही पडूं दिले नाहींत, तर अशा प्रकारच्या शाळेंत तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या मनाची स्थिति काय होईल ? इंग्रजी शिक्षणाची गोष्ट अशाच प्रकारची होय. त्यांतून पेशवाईच्या अखेर आमच्या समाजास एक प्रकारची शिथिलता येऊन त्यांत दुर्गुणांचा बराच प्रसार झालेला होता. ही स्थिति आणि त्यानंतर दृष्टोत्पत्तीस येणारी नवीन राज्यकर्त्यांची व्यवस्था व टापटीप यांनीं चांगले लोकही दिपावून जाण्याचा संभव होता. मग ज्यांचें शिक्षण वर सांगितल्याप्रमाणें अगदीं एक अंगी होतें, त्यांची गोष्ट तर बोलावयास नकोच. आमच्या समाजांत अमुक उणें आहे, तमुक उणें आहे हेच काय ते रात्रंदिवस त्यांचे विचार चालावे. याचे. त्यांतून मिशनरी लोकांस उत्तरें देण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी आहे, पण नुसत्या तार्किक वादानें मिशनरी लोकांशी भांडून आमच्या समाजाचें व्हावें तसें रक्षण होत नाहीं ही गोष्ट त्या वेळच्या पुढाऱ्यांस अगदींच कळली नव्हती असें नाहीं, परंतु त्यांनीं त्यासाठीं जे उपाय योजले तें मात्र उपहासास्पद होते. ख्रिस्ती धर्माचा प्रतिकार करावयाचा असल्यास तो त्याच धर्मातील बाह्योपांगें घेऊन त्यांस एकेश्वरी किंवा प्रार्थनासमाज असें नांव देऊन नवीन पंथ काढल्यानें होईल, हीच काय ती त्या वेळच्या पुढाऱ्यांची प्रमुख

कल्पना होती, व ही कल्पना तडीस नेण्यास आपण योग्य व लायक आहों असेंही त्यांस वाटत असे. परंतु लौकिक दृष्ट्या आणि तात्त्विक दृष्ट्याही हा समज चुकीचा होता. नवीन धर्मपंथ स्थापणाराच्या अंगीं कोणत्या प्रकारचे गुण असावे लागतात याची इंग्रजी शिकलेल्या पहिल्या दोन पिढींच्या लोकांस बिलकूल कल्पना नव्हती. इंग्रजी दहा पांच बुकांचें अध्ययन झालें, मोठी नोकरी मिळाली किंवा अधिकार प्राप्त झाला म्हणजे तो मनुष्य सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत पुढाकार घेण्यास नेहमींच योग्य असतो असें नाहीं. हें तत्त्व आमच्या मंडळीस पहिल्यानें कित्येक वर्षें बिलकूल समजलें नव्हतें. त्यामुळें असा परिणाम झाला कीं, इंग्रजी शिकलेली पहिल्या दोन पिढींतील मंडळी समाजास ज्या दिशेनें ओढण्याचा प्रयत्न करूं लागली त्याच्या उलट समाजाची प्रतिक्रिया सुरू होऊन दोघांचा बेबनाव सुरू झाला. कोणत्याही समाजाचा ज्यास पुढाकार घ्यावयाचा असेल त्यानें आपल्या एकनिष्ठपणानें, नीतिमत्तेनें, स्वार्थत्यागानें व समाजाबद्दलच्या खऱ्या कळकळीनें समाजाचा विश्वास पहिल्यानें संपादन केला पाहिजे, पण हे गुण वर सांगितलेल्या इंग्रजी शिकलेल्या नव्या पिढींतील लोकांच्या अंगांत दिसून येत नव्हते. यांच्यापैकीं कांहीं मंडळी विद्वान होती खरी; पण समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षां सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरूर लागत असते. ही गोष्ट या पिढ्यांतील विद्वान मंडळी अगदींच विसरली होती असें म्हटलें तरी चालेल. त्यांस असें वाटे कीं, आम्ही नवीन विद्या संपादन केली, सरकारांत आमचा मान झाला, तरी अद्याप आमचे लोक ऐकत नाहींत हें काय? दुसऱ्या पक्षीं हा पक्ष अगदींच अडाणी होता असें नाहीं. लोकांस असें वाटे कीं, पाश्चिमात्य शिक्षणाचा थोडाबहुत लाभ झाल्यानें मनुष्य कांहीं सर्वज्ञ होतो असें नाहीं. त्यांतून या नवीन पिढीचे अद्वातद्वा आचारविचार, आहार, मतें वगैरे लोकांच्या नेहमीं नजरेस पडत असल्यामुळें त्यांच्याबद्दल लोकांची चांगली बुद्धि राहिलेली नव्हती.

हजारों वर्षें चालत असलेली समाजव्यवस्था व रचना आपण चुटकीसरशी उडवून देऊं असें मानणारा किंवा म्हणणारा मनुष्य उपहासास पात्र झाल्यास त्याचा दोष लोकांकडे देणें चुकीचें होय. परंतु पाश्चिमात्य शिक्षणाच्या पहिल्या मदानें धुंद झालेल्या मंडळीच्या नजरेस ही विसंगतता आली नाहीं व स्वदेशकल्याण करण्याची मोठी हाव धरून कोणी धर्माच्या तर कोणी सामाजिक सुधारणेच्या मागे लागले. हिंदुराष्ट्राचें इंग्रजांच्या अंमलापासून हित होत आहे कीं अहित होत आहे, लोकांच्या उपजीविकेचीं साधनें उत्तरोत्तर कमी होत आहेत कीं वाढत आहेत, संघशक्तीनें काम करण्याची संवय त्यांस लागण्याचा कितपत संभव आहे, मनुष्याच्या अंगची बुद्धि, कर्तबगारी किंवा हुशारी दाखविण्यास नवीन राज्यव्यवस्थेंत अवकाश आहे कीं नाहीं, इत्यादि ज्या गोष्टींचा सन १८७५ नंतर महाराष्ट्रांत खल होऊं लागला, त्याजकडे तत्पूर्वीच्या दोनतीन पिढ्यांनीं फारसें लक्ष दिलेलें दिसत नाहीं. यांचा भर काय तो धार्मिक आणि सामाजिक सुधारणेवर होता; आणि या दोन्ही बाबतींत पुढारीपणा घेण्यास ज्या गुणांची आवश्यकता असते त्यांचा बहुतेकांच्या अंगीं पूर्ण अभाव होता. परंतु ही नवीन शिकलेली मंडळी अधिकारारूढ असल्यामुळे समाजांतील इतर लोकांस यांचे स्वेच्छाचार ऐकून किंवा पाहूनच स्वस्थ बसावें लागे. समाजास यांचे आचारविचार बिलकूल ग्राह्य नव्हते इतकेंच नव्हे, तर समाजास कोणत्याही प्रकारचें व्यवस्थित रूप देण्यास जे पुढाऱ्यांचे अंगीं गुण पाहिजेत ते यांच्या अंगीं नाहींत अशी समाजाची खात्री झालेली होती. सारांश, उतावळ्या नवऱ्याप्रमाणें बाशिंग बांधून आपलें व आपल्याबरोबर समाजाचेंही आपण काढलेल्या नवीन संस्था यांशी लग्न लावून देण्यासहि मंडळी जरी तयार झाली होती, तरी यांच्या अद्वातद्वा आचरणानें आणि अव्यवस्थित गृहस्थितीनें समाजाचा त्यांच्यावर पूर्वी कांहीं विश्वास असल्यास तो अगदीं उडून गेलेला होता, व यांचे पुढारीपण यांच्या परिवाराखेरीज समाजांतील इतर लोक

कबूल करण्यास तयार नव्हते. कै० विष्णुशास्त्री यांचा विद्याभ्यास संपून लेखक या नात्यानें त्यांच्या कारकीर्दीस सुरवात होण्याचे वेळीं मागें सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांतील इंग्रजी शिकलेले विद्वान व समाज यांची स्थिति होती. विष्णुशास्त्री यांस सर्वच जुनीं मतें ग्राह्य नव्हतीं. किंवा जुनी समाजव्यवस्था नवीन परिस्थितींत तशीच कायम ठेवितां येईल असें वाटत नव्हतें हें खरें आहे. पण त्याबरोबरच त्यांच्या पूर्वींच्या इंग्रजी शिकलेल्या दोनतीन पिढ्यांनीं सुधारणेच्या नांवावर जो हुतुतूचा खेळ सुरू केला होता तो अगदीं अप्रयोजक असून इंग्रजी शिकलेल्या पुढारी म्हणविणाऱ्यांच्या अंगीं, खरोखर पुढाऱ्यांत जे गुण असावयास पाहिजेत ते नाहींत हेंही त्यांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. राजकर्त्यांच्या गुणापैकीं पुष्कळ गुण आम्हीं घेण्यासारखे आहेत ही गोष्ट त्यांनीं अनेक ठिकाणीं प्रांजलपणें कबूल केलेली आहे; पण पाश्चिमात्य समाजरचना युरोपांतील राष्ट्रांत चांगली चालत असली तरी ती आम्हांस तशीच श्रेयस्कर होईल असें पूर्वींच्या पिढीचें जें निःशंक मत होतें तें शास्त्रीबुवांस मान्य नव्हतें. शिवाय कोणत्याही समाजास किंवा राष्ट्रास जें एकप्रकारचें वैशिष्ट्य येतें तें कांहीं विशिष्ट समाजरचना, धर्मबंधनें वगैरे कारणांनींच आलेलें असतें. तशा प्रकारचें राष्ट्राचें वैशिष्ट्य होतां होईल तितकें कायम ठेवणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्य होय. पण तिकडे शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या पिढींतील पुढाऱ्यांनीं कधींच लक्ष पुरविलें नव्हतें. फार लांब कशाला! हिंदुधर्माचीं खरीं तत्वें काय आहेत, त्यांतील ग्रंथसमूह कोणत्या प्रकारचा आहे, त्यांत धर्माच्या उदात्त तत्वांचा विचार केलेला आहे कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा पुरा शोध एकेश्वरीवाल्यांनीं केलेला नव्हता. सारांश, शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या पिढ्यांतील लोकांनीं ज्या ज्या चळवळी सुरू केल्या होत्या त्या सर्व केवळ नवीन पाश्चिमात्य शिक्षणास हुरळून जाऊन केल्या होत्या. प्रौक्त विचार, दृढ व सतत अभ्यास, सदाचरण, नीतिधैर्य किंवा स्वार्थत्याग हे गुण या चळवळीच्या पुरस्कर्त्यांच्या अंगीं नजरेस येत

नव्हते. उलट यांचें वर्तन व आचार यांत एकप्रकारची शिथिलता व आचरटपणा आढळून येत होता. जुनें तेवढें वाईट, असा आपल्या पुढील पिढीवा समज करण्याचा यांनीं प्रयत्न चालविला होता आणि स्वतःच्या आचरणानें तरुण मंडळीस अव्यवस्थितपणाचा व नीति-दौर्बल्याचा हे कित्ता घालून देत होते. वृद्ध लोकांबद्दल अपूज्यभाव, अंगीकृत कार्य निश्चयानें पार पाडण्याविषयीं अनास्था, नीतिधैर्याचा किंवा आजन्म सतत व्यासंग करून कोणतीही गोष्ट स्वार्थाकडे लक्ष न देतां सिद्धीस नेण्याच्या हौसेचा अभाव इत्यादि अवगुण जर आजमित्तीस इंग्रजी शिकलेल्या तरुण मंडळींत आढळून येत असले तर त्यांचे सर्व श्रेय विष्णुशास्त्री यांच्या पूर्वींच्या पिढ्यांनीं जो क्रम सुरू केला होता त्यांसच दिलें पाहिजे. या विषवृक्षाचें बीं विष्णुशास्त्री यांच्यापूर्वीं फार दिवस लागलें होतें व शास्त्रीबुवांच्या लेखांचा जर कांहीं परिणाम झाला असला तर या विषवृक्षाची वाढ थोडीबहुत कमी करण्याकडेसच झाला असें ज्यांस पूर्वींची हकीकत माहीत आहे त्यांस तरी म्हटलेंच पाहिजे. विष्णुशास्त्री यांनीं आपल्या वेळच्या कांहीं बऱ्या मंडळीची टर उडवून तरुण पिढीच्या मनांतील वृद्धां-बद्दलची पूज्यबुद्धि घालविली असें कित्येकांचें म्हणणें आहे, पण तें चुकीचें आहे. खरा प्रकार असा आहे कीं, शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या दोन पिढ्यांतील मंडळी, प्राचीन आचारविचार किंवा सामाजिक व धार्मिक व्यवस्था यांच्या पूर्व प्रवर्तकांस मूर्ख ठरवून त्यांच्या जागीं आपण स्थानापन्न होण्याच्या तयारीस लागलेली होती; व त्यांचा असा भरंवसा होता कीं, आपल्यामागून आपल्या तालमींत तयार झालेली जी तरुण पिढी येईल ती आपलें गौरव करून आपल्यास अभिनव धर्मसंस्थापकांचें किंवा समाजरचनाप्रवर्तन करणाऱ्यांचें अढळ स्थान प्राप्त करून देईल ! पण त्यांचें स्वतःचें आचरण अगदींच अव्यवस्थित असल्यामुळें हा त्यांचा भरंवसा तडीस न जातां त्यांच्या अविचारांचीं फळें त्यांस भोगावीं लागलीं. ज्या लोकांनीं मनु, शंकराचार्य, रामदास किंवा तुकाराम इत्यादिकांसही मूर्ख ठरवून

आचार, विचार, विहार व आहार यांच्या स्वच्छंदावर नवीन धर्माचें निशाण उभें केलें त्यांस त्यांच्या पुढच्या पिढीनें मूर्ख ठरविल्यास ती गोष्ट जगाच्या राहटीच्या फारशी विरुद्ध झाली असें म्हणतां यावयाचें नाहीं. विष्णुशास्त्री यांनीं आपल्या लेखांनीं काय कामगिरी बजाविली हें समजण्यास वर दिलेल्या तत्पूर्वीच्या दोन तीन पिढ्यांची सामान्य हकीकत पुरे आहे. राष्ट्राच्या अभ्युदयास स्वभाषा, स्वधर्म यांबद्दल योग्य अभिमान व प्रेम समाजाच्या पुढाऱ्यांच्या अंगीं असणें किती, जरूर आहे वगैरे गोष्टींचा विचार न करितां अथवा आपली बलाबलता न पाहतां ज्यांनीं केवळ अभिनव शिक्षणाच्या जोरावर देश सुधारण्याची पताक हातीं घेतली होती, त्यांस शास्त्रीबुवांसारखा पुरुष न निपजला असतां तरीही अखेर अपयशाचेंच धनी व्हावें लागलें असतें. त्यांस जे महत्त्व आलें होतें तें आगंतुक होत, आणि इंग्रजी ज्ञानाचा जास्त प्रसार होऊन विद्वानांचा दर पुढें लवकरच उतरणें अगदीं स्वाभाविक होतें व त्याप्रमाणें झालेंही. विष्णुशास्त्री हे या मंडळीच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण करण्यास केवळ निमित्तमात्र झाले असें म्हटलें तरी चालेल. उतास गेलेलें दूध ज्याप्रमाणें केव्हांना केव्हां तरी अग्नींत पडून दग्ध व्हावयाचेंच तशीच या दोनतीन पिढ्यांतील पुरुषांनीं आरंभिलेल्या चळवळीची स्थिति होत चालली होती. शास्त्रीबुवांस सदर चळवळीवर व त्यांच्या पुरस्कर्त्यांवर हल्ला करून त्यांच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण करण्याचा जो मान मिळाला तो ते ज्या कालीं जन्मले त्या कालाचें फल होय, शास्त्रीबुवांच्या इच्छेचें नव्हे. कारण शास्त्रीबुवा नसते तर दुसरा कोणी तरी पुरुष या कार्यास त्या काळीं खचित प्रवृत्त झाला असता. नुसत्या इंग्रजी शिक्षणानें दहापांच नव्या कल्पना मनांत शिरल्याबरोबर कोणताही पुरुष समाजाचा पुढाकार घेण्यास पात्र होतो ही कल्पनाच चुकीची होय. व या कल्पनेच्या पायावर ज्या चळवळीची इमारत उभारली गेली होती, त्या चळवळी केव्हांना केव्हां तरी खालीं पडणें अगदीं स्वाभाविक होतें. शास्त्रीबुवांनीं त्या पाडल्या

असें म्हणण्यापेक्षां त्यांचे दिवस संपायची वेळ आणि शास्त्रीबुवांच्या कारकीर्दीचा आरंभ एक झाला हें म्हणणें अधिक सयुक्तिक होय. शास्त्रीबुवांनीं या चळवळींतील पोंचटपणा ताबडतोब ओळखून तिकडे आपल्या लेखांचा मोर्चा फिरविला, हें त्यांच्या मार्मिकपणाचें फल आहे; व त्यांच्या ठिकाणीं त्या वेळीं दुसरा कोणीही पुरुष असता तरी त्यानें असेंच वर्तन केलें असतें. वरील हकीकतीवरून सवंग लोकप्रियता मिळविण्याकरितां शास्त्रीबुवांनीं आपल्या वेळच्या चळवळीवर हल्ला केला असा जो कित्येकांचा आक्षेप आहे तो किती निरर्थक आहे हें सहज दिसून येईल. शास्त्रीबुवांनीं ज्या चळवळींवर हल्ला केला त्यांचा पोकळपणा व त्याच्या पुरस्कर्त्यांच्या वर्तनाचा अव्यवस्थितपणा लोकांच्या नजरेस येऊन पुष्कळ दिवस झाले होते. परंतु या पुढारी म्हणविणाऱ्या मंडळीच्या कह्यांतून त्यांच्याच योग्यतेचा पुरुष अद्याप कोणी बाहेर पडला नसल्यामुळें पुष्कळांस जरी या चळवळी उतावळीच्या व अविचाराच्या वाटत तरी त्यासंबंधीं सोपपत्तिक लेख लिहून सदर चळवळींची अगर त्यांच्या पुरस्कर्त्यांची खरी स्थिति लोकांपुढें मांडण्यास कोणी तयार झाला नव्हता. विष्णुशास्त्री हे अशा प्रकारचे पहिलेच टीकाकार होत. यांस मार्मिकपणाचा संस्कार पितृपरंपरेनें प्राप्त झाला होता, व मराठी आणि संस्कृत ग्रंथांशीं त्यांचा परिचयही इतरांपेक्षां सहजगत्या अधिक झालेला असून हिंदुस्थानच्या व पाश्चिमात्य राष्ट्रांच्या इतिहासाच्या वाचनानें व मननानें राष्ट्राच्या अभ्युदयास कोणत्या प्रकारचे पुढारी लागतात अथवा त्यांच्या अंगीं कोणते गुण असावे लागतात हें त्यांस जास्त चांगलें अवगत झालेलें होतें.

इतके गुण असूनही ते कदाचित् पूर्वीच्या पिढीच्या विद्वानांच्या धर्तीवर गेले असते; परंतु कालमानानें इंग्रजी शिक्षणाचें महत्त्व कमी होत गेलें होतें व त्यांतल्या त्यांत विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, विष्णुशास्त्री हे स्वभावतःच अल्पसंतुष्ट असल्यामुळें आपल्या विद्येचा व गुणांचा स्वतःच्या बढतीकडे उपयोग करून घेण्यापेक्षां

लोकांत खऱ्या ज्ञानाचा व विचारांचा जेणेंकरून प्रसार होईल तें काम अधिक महत्त्वाचें आहे असें त्यांस वाटत असे. अशा स्थितींत त्यांनीं आपल्या कर्तव्याची जी दिशा ठरविली व ज्या दिशेनें काम करण्याचा आपला निश्चय तडीस नेण्यास त्यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न केला, त्याबद्दल त्यांस नांवें ठेवणें म्हणजे आपलें गाजरपारखेपण व्यक्त करणें होय. एकेश्वरीमताचे किंवा प्रार्थनासमाजाचे पोवाडे शास्त्रीबोवांनीं गाइले नाहींत म्हणून तत्पक्षीय लोक त्यांस नांवें ठेवितात, पण ज्यांनीं या संस्था उभारल्या त्यापैकीं एका तरी पुरुषानें या संस्थांचीं मतें सयुक्तिक असून सर्व पूर्वाचार सोडून लोकांनीं तीं घेण्यासारखीं आहेत असें प्रतिपादन करण्यांत आपलें सर्वस्व खर्च केलें आहे काय ? नाहीं. मग शास्त्रीबुवांनीं त्यांचे पोवाडे गाइले नाहींत म्हणून त्यांस दोष देणें म्हणजे ' मी जें कांहीं भांगेच्या तारेंत बोललों तें दुसरा कोणी पंडित समर्थन करीत नाहीं ' म्हणून पंडितवर्गास दूषण देण्याइतकेंच असमंजस नव्हे काय ? आपल्या पूर्वीच्या पिढींतील लोकांनी आरंभिलेल्या चळवळी निर्जीव व पोंचट आहेत अशी मनाची एकदां खात्री झाल्यावर त्यांचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडणें हें देशहितासाठीं झटणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य नव्हे काय ? आणि शास्त्रीबुवांनीं तें कर्तव्य केलें म्हणून त्यांस कां नांवें ठेवावीं हें मला समजत नाहीं. या चळवळीचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडण्यास ज्या साधनांची जरूर होती तीं सर्व साधनें शास्त्रीबुवांस उपलब्ध होतीं. पहिली गोष्ट अशी कीं, या चळवळी ज्यांनीं उभारल्या होत्या त्यांची नीतिदृष्ट्या, धर्मदृष्ट्या किंवा आचरणदृष्ट्या योग्यता किती होती हें त्यांस पूर्णपणें माहीत होतें. तसेंच दहावीस वर्षांच्या अनुभवानें या चळवळी लोकांस कितपत हितकारक होऊं शकतील याचाही त्यांस अदमास आलेला होता; व त्यांत काय काय दोष आहेत ते ताबडतोब ओळखून लोकांपुढें सदर दोषांचें चित्र हुबेहुब वठविण्याइतका मार्मिकपणा व

कल्पकताही त्यांच अंगांत होती. अशा स्थितींत त्यांचे लेख चटकदार व लोकप्रिय झाले यांत कांहीं एक नवल नाहीं. लोकांस या गोष्टी हव्या होत्या, व तत्कालीन पुढारी मंडळींची कानउघडणी करणारा पुरुष केव्हां पुढे येतो याची ते अगदीं वाट पाहत होते. अशा वेळीं शास्त्रीबुवांखेरीज दुसरे कोणीं हें काम केलें असतें तर तेही लोकप्रिय झाले असते. पण शास्त्रीबुवांनीं तें केल्यामुळे त्यांच्या मार्मिकपणाची त्यांत अधिक भर पडून तेंच काम अधिक सफाईनें तडीस गेलें, एवढाच काय तो विशेष होय. विष्णुशास्त्री यांजवर त्यांच्या प्रतिपक्ष्यांचा दुसरा असा एक आक्षेप आहे कीं, सुधारकांचीं सर्व मतें त्याज्य नाहींत अशी त्यांची समजूत असतांही त्यांनीं आपली लेखणी सुधारकांविरुद्ध चालवून त्यांचा जणूं काय सूड घेतला. माझ्या मतें हाही आक्षेप निरर्थक आहे. हिंदुसमाजाच्या आजपर्यंतच्या चालत आलेल्या रचनेंत देशकालमानानें कांहीं फेरफार झाले पाहिजेत एवढें कोणीहि विचारी मनुष्य कबूल करील. पण हे फेरफार घडवून आणण्याकरितां ज्या व्यक्तींची किंवा उपायांची योजना करावयाची त्या व्यक्ति किंवा उपाय कोणत्या प्रकारचे पाहिजेत याबद्दल मतभेद असणें अगदीं शक्य आहे. शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या पिढींतील लोकांचें असे मत होतें कीं, इंग्रजी शिक्षणानें दहापांच नव्या गोष्टी कळूं लागल्याबरोबर तो मनुष्य समाज सुधारण्याची ध्वजा हातीं घेण्यास योग्य झाला, इतकेंच नव्हे तर आचारस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य यांचा पूर्णपणे उपयोग करण्यास त्यांस हक्क प्राप्त होऊन त्याची गणना परमहंसाच्या कोटींत लोकांनीं करावयास पाहिजे. कोणास ही कदाचित थट्टा वाटेल; पण खरोखरच अशा तऱ्हेची 'परमहंस मंडळी' मुंबईस निघालेली होती, ही सुधारणा नव्हे, आचरटपणा होय. हे विचारस्वातंत्र्य नव्हे, अव्यवस्थितपणा होय, असें उघडपणें सांगणारा व प्रतिपादन करणारा गृहस्थ विष्णुशास्त्री यांच्यापूर्वीं कोणी निघालेला नव्हता. समाजाचें मत पहिल्या दिवसापासूनच असें होतें, पण वर

सांगितलेल्या कारणाकरितां तें प्रतिपादन करण्यांस कोणी पुढं आलें नव्हतें. ते विष्णुशास्त्री आले एवढाच काय तो विशेष होय. हा आचरटपणा जगास व्यक्त करून दाखविणारा पुरुष प्राचीन आचार-विचारांचा सर्वांशीं भोक्ता असला पाहिजे ही कल्पना युक्तांच्या किंवा तर्कशास्त्राच्या कसोटीस टिकेल असें मला वाटत नाहीं. फार लांब कशाला ? उद्यां जर जुन्या पद्धतीनें शिकलेल्या शास्त्र्यांचीच सभा बोलाविली तरी त्यांत देखील देशकालानुरोधानें जुन्या समाजव्यवस्थेंत कांहीं फेरफार केले पाहिजेत असें म्हणणारें कांहं शास्त्री निघतील; पण तेवढ्याकरितां त्यांनीं नव्या मंडळीच्या आचरटपणाकडे किंवा अव्यवस्थितपणाकडे दुर्लक्ष केलें पाहिजे असें म्हणणें अगदीं वेडेपणाचें होय. समाजास कांहीं बंधनें पाहिजेत आणि तीं बंधनें कायम राहण्यास प्राचीन संस्थांचा एक प्रकारचा अभिमान ज्यास नाहीं किंवा समाजाचीं बंधनें वाटेल तेव्हां तोडण्यास जे नेहमीं तयार असतात अशांनीं समाजसुधारणेची ध्वजा हातीं घेऊन लोकांचे पुढारी होण्याची हांव धरणें अत्यंत अप्रयोजक व उपहासास्पद होय. शास्त्रीबोवांची खरी लोकसेवा हीच कीं, त्यांनीं असल्या मंडळींची स्थिति लोकांपुढें मांडली. इंग्लिश शिक्षणास सुरवात होऊन तेव्हां कांहीं नाहीं तरी चाळीस वर्षें झालीं होतीं. इतक्या मुदतीत या नाचऱ्या चळवळींपेक्षां अधिक उपयुक्त व शाश्वत अशीं फारच थोडीं कामें या दोनतीन पिढींच्या लोकांच्या हातून झालेली आहेत, किंबहुना मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल. या मंडळींनीं आपल्या उदाहरणानें तरुण पिढीस जो एक प्रकारच्या अव्यवस्थितपणाचा कित्ता घालून दिला त्याचीं मात्र फळें आज आम्ही भोगीत आहों. समाजास किंवा देशास एक प्रकारची गति पाहिजे एवढें कोणा एकास कबूल असलें म्हणजे समाजरूपी नौकेस आचरटपणाच्या व अव्यवस्थितपणाच्या वावटळींत भडकूं देण्यास त्यानें आपली संमति दिली पाहिजे असें कोणीही समंजस पुरुष म्हणणार नाहीं व शास्त्रीबोवांसही तोच न्याय लागू केला पाहिजे. भगवद्गीतेमध्यें " न बुद्धिभेदं जनयेद-

ज्ञानां कर्मसंगिनाम्। जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन्॥ असें जें सांगितलें आहे त्यांतील बीज हेंच होय. तुकारामासारख्या अंतर्बाह्य पांडुरंगमय झालेल्या साधूस न्हाव्याभटांची किंवा तीर्थांची निंदा करण्याचा किंवा प्रसंगविशेषीं श्रीपांडुरंगासही टाकून बोलण्याचा अधिकार होता तोच आम्हां संसारिकांनीं बजाविल्यास आम्हीं आपल्यास किती उपहासास्पद करून घेऊं हें सांगावयास नकोच. नुसत्या बुद्धीनें अमुक एक गोष्ट बरी किंवा अमुक एक वाईट हें जाणणें सर्वांस जरी शक्य नसलें तरी तेवढ्यानेंच इष्ट सिद्धि होत नाहीं. लोकांत जर कोणत्याही विशिष्ट मताचा प्रचार करावयाचा असेल तर त्यास बुद्धिवादापेक्षां निराळ्या तऱ्हेचा अधिकार लागतो. तो अधिकार ज्यांस नाहीं त्यांनीं विनाकारण बडबड करून पुढारीपणाचें सोंग आणण्यापेक्षां आपल्या शक्त्यनुसार योग्य उद्योग केल्यास तो अधिक श्रेयस्कर होईल हें उघड आहे. शास्त्रीबोवांच्या लेखांतून व टीकेंतून जर कांहीं बोध घेण्यासारखा असला तर तो हाच होय, व त्याचकरितां त्यांच्या लेखास आम्ही इतकें महत्त्व देतों. शास्त्रीबोवासंबंधानें शेवटला आक्षेप म्हणजे कडक भाषेसंबंधाचा होय. पण हाही आक्षेप मागल्याइतकाच किंबहुना त्याहूनही अधिक-अप्रयोजक आहे. एकदां लढाईस सुरुवात झाल्यावर प्रतिपक्षानें आपलीं शस्त्रास्त्रें अधिक तीक्ष्ण करण्याची खबरदारी ठेविली होती अशी ओरड करीत बसणें, म्हणजे आपल्या दौर्बल्याचा दोष विनाकारण लोकांच्या माथीं मारणें होय. मनुष्याचे विचार एकमेकांस कळविण्यास भाषा हें एकच साधन आहे; आणि त्या भाषेचा अपकर्ष करणारा मनुष्य सर्व वस्तु चोरणाऱ्या मनुष्यापेक्षांही जास्त निंद्य आहे, असें मनुनें सांगितलें आहे. निंदेसंबधानें हा जो न्याय आहे तोच उत्कर्षासंबंधानें लागू होतो. स्वभाषेच्या अंगीं नानातऱ्हेचे मनोविकार व्यक्त करण्याची शक्ति आणणाऱ्या पुरुषाचे लोकांवर जे उपकार होतात ते ज्यांनीं भाषेची प्रथमतः युक्ति काढून व्यवहारसौकर्य केलें त्याच्या उपकारापेक्षां फारसे कमी नाहीत. स्वभाषेची अभिवृद्धि व

उत्कर्ष हें स्वराष्ट्राच्या उत्कर्षाचें एक प्रमुख साधन आहे व तें साधन विष्णुशास्त्री यांनीं जितकें परिपूर्णतेस आणिलें तितकें पूर्वी कोणींच आणिलें नव्हतें ही गोष्ट सर्वमान्य आहे. आपल्या देशांतील लहान-मोठ्या लोकांस आपले विचार कळवावे अशी ज्यास उत्कट इच्छा असेल त्यास स्वभाषेखेरीज दुसरें साधन नाहीं, हें इंग्रजी शिकलेल्या लोकांनीं पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे व ज्यास लोकांबद्दल कळकळ नाहीं किंवा त्यांस कांहीं ज्ञानाच्या गोष्टी सांगणें अवश्य आहे असें वाटत नाहीं, त्याच्या हातून स्वभाषेचा कधीं उत्कर्षही व्हावयाचा नाहीं, विष्णुशास्त्री यांच्या बरोबरीचे त्या वेळीं दुसरे विद्वान झाले नाहींत असें नाहीं, पण मराठी भाषा त्यांनीं हातीं न धरण्याचें कारण त्यांच्या अंगीं लोकांबद्दल खऱ्या कळकळीचा अभाव हेंच होय. एखाद्या इंग्रजी बुकाचें साफ भाषांतर करणें किंवा साळुबाईची गोष्ट सजवून सांगणें यास मराठी भाषेचें ज्ञान लागत नाहीं असें नाहीं; पण मला लोकांच्या मनांत अमुक गोष्ट भरवून दिली पाहिजे अशा कळकळीनें ज्याचें अंतःकरण जळत नाहीं, त्याच्या हातून स्वभाषेची खरी सेवा होणें अशक्य होय. रंगभूमीवर हावभाव किंवा अंगविकार यांच्या साहाय्यानें वक्त्यास किंवा नटास आपले मनोविकार सभाजनास कमजास्त प्रमाणानें व्यक्त करितां येतात, पण पाठऱ्यावर काळें करून तद्द्वारा लोकांचें चित्ताकर्षण करून घेणें अंतःकरणांत खरी कळकळ असल्याखेरीज शक्य नाहीं, ‘ तेथें पाहिजे जातीचे येर गबाळाचें काम नाहीं ’ असें जें तुकारामबुवांनीं म्हटलें आहे तें प्रस्तुत प्रकरणीं अगदीं बरोबर लागू पडतें. कित्येक लोकांची अशी समजुत आहे की, चांगला लेख कोणता ? तर ज्यांत दोहो पक्षांचा समतोलपणा राखून कोणास न दुखवितां दरबारी रीतीनं विषयाचें विवेचन केलेलें असतें. चांगल्या लेखाची ही व्याख्या दरबारी लोकांनीं पाहिजे तर लक्षांत ठेवावी. पण ज्यास आपल्या विचाराची लोकांवर छाप बसवावयाची असेल, किंवा वाग्देवीच्या प्रसादानें लोकांच्या मनोवृत्ति जागृत करावयाच्या असतील, त्यानें “ अमर्ष-

शून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषादरः " हाच न्याय स्वीकारिला पाहिजे. इंग्रजीमध्यें जॉनसन, मेकाले वगैरे जे मोठमोठे ग्रंथकार झाले त्यांचीं मतें सर्वांस सर्वांशीं ग्राह्य आहेत असें नाहीं; पण भाषेच्या अंगीं त्यांनीं जी मर्दुमकी दाखविली आहे तिचा राष्ट्राच्या अभिवृद्धीस जो उपयोग झाला तो लोक कधींही विसरणार नाहींत. भाषा हें राष्ट्राचें हत्यार होय; आणि हें हत्यार जो तयार करून देतो त्याचे राष्ट्रांवर कांहीं लहानसहान उपकार नाहींत. अशा रीतीनें पाहिलें म्हणजे शास्त्रीबोवांचीं मतें कोणास ग्राह्य नसलीं तरीही त्यांनीं त्यांचे उपकारच मानिले पाहिजेत. चांगली भाषा लिहिण्यास किंवा वापरण्यास कांहीं तरी विषय पाहिजेच व तो विषय प्रत्येक ग्रंथकाराच्या वेळीं प्रचलित असलेल्या विषयांतूनच त्यानें निवडून घेतला पाहिजे. शास्त्रीबोवांनीं जो विषय घेतला तो त्यांच्या पूर्वीच्या पिढ्यांनीं जे उद्योग सुरू केले होते त्यामुळें ओघानेंच प्राप्त झालेला होता हें वर सांगितलेंच आहे. हा विषय एकदां हातीं घेतल्यावर स्वभाषेंत निरनिराळे मनोविकार हुबेहुब वठविण्याचें त्यांच्या अंगीं जें सामर्थ्य होतें व आपल्या देशबांधवांस आपले विचार कळवून त्यांस जागृत करण्याबद्दल जी त्यांच्या अंतःकरणांत कळकळ होती ती सर्व या कार्याकडे त्यांनीं खर्च केली यांत कांहीं नवल नाहीं. त्याजकरितां त्यांस दोष देणें म्हणजे " शंकराचार्यांनीं आपली विद्वत्ता तारायंत्र शोधून काढण्यांत कां खर्च केली नाहीं ? " असें म्हणण्याइतकेंच अविचाराचें होय. त्यांनीं स्वभाषेची अभिवृद्धि करून आपल्या देशावर जे उपकार करून ठेविले आहेत त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यास आम्हांस पुष्कळ दिवस लागतील. हे उपकार न स्मरतां त्यांचे लेख कडक आहेत वगैरे कांहीं तरी सबबी काढून त्यांचें महत्त्व कमी करण्यास पाहणें माझ्यामतें अगदीं अक्षम्य आहे. शास्त्रीबोवांनीं जे कांहीं लेख लिहिले आहेत ते स्वतःच्या मोक्षप्राप्तीकरितां नव्हते, त्यांच्या वेळीं जीं ढोंगें प्रचारांत आलीं होतीं त्यांचा परिस्फोट करणें सार्वजनिक दृष्ट्या आपलें कर्तव्य आहे अशा समजुतीनें

त्यांनीं हे लेख लिहिलेले आहेत; व ते लेख जितके चटकदार व मनोरंजक करतां येण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य होतें तितकें जर त्यांत त्यांनीं खर्च केलें नसतें तर आपलें कर्तव्य नीटपणें न केल्याचा दोष त्यांचा माथीं येता. शास्त्रीबोवांच्या मताहून कोणाचीं मतें भिन्न असूं शकतील, नाहीं असें नाहीं; पण अमक्याच्या मताहून त्यांचीं मतें भिन्न होतीं म्हणून कुत्सित बुद्धीनें शास्त्रीबोवांनीं कडक भाषा वापरली असें म्हणणें म्हणजे खुबडानें आपल्या द्वेषानें सूर्य अधिक प्रखर तापतो असें म्हणण्याइतकेंच असमंजसपणाचें आहे.

अखेरीस शास्त्रीबुवांच्या स्वार्थत्यागासंबंधानें हल्लीं जो एक नवा आक्षेप निघाला आहे त्याबद्दल दोन शब्द लिहून हा लेख संपवितों. स्वार्थत्याग कशास म्हणावा आणि कशास म्हणूं नये याबद्दल व्याख्या करीत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. शास्त्रीबुवांनीं सरकारी नोकरी सोडली ती पुढील अंदाज पाहून सोडली हा कांहीं त्यांचा दोष नव्हे. त्यांच्या वडिलांनीं त्यांस कांहीं जहागीर ठेविलेली नव्हती. अर्थात् आपलें व आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाचें साधन पाहणें हें त्यांचें कर्तव्य होतें; पण आपणांस पोट भरण्याची कांहीं पंचाईत नाहीं इतकी खात्री झाल्यावर अधिकाराच्या किंवा द्रव्याच्या लोभानें ते स्वकर्तव्यास पराङ्मुख झाले नाहींत हाच त्यांच्या अंगचा मोठा गुण होय. प्रत्येक मनुष्य आपापल्या हातून काय होईल याचा अदमास करूनच त्या कामांत पडत असतो, असा अदमास न करील तो मूर्ख होय; पण आपल्या आवडीप्रमाणें किंवा शक्तीप्रमाणें कर्तव्याची दिशा ठरविल्यानंतर उदरपोषणाकरितां नव्हे, तर द्रव्य व अधिकार यांच्या लालचीनें जो मनुष्य आपलें ठरविलेलें कर्तव्य सोडून देतो किंवा क्षणभर बाजूला ठेवतो तो पुढारी नव्हे आणि देशाचा हितकर्ताही नव्हे. अशा दृष्टीनें विचार केला असतां शास्त्रीबुवांनीं आपल्या कर्तव्याची जी दिशा ठरविलेली होती ती सरकारी नोकरीशीं विसंगत आहे असें आढळून आल्याबरोबर नोकरीपेक्षां कर्तव्या-

कडे. त्यांनीं जास्त लक्ष दिलें हेंच त्यांच्या अंगच्या खऱ्या धैर्याचें लक्षण होय. मनुष्याच्या पारखेची खरी वेळ हीच असते. शास्त्रीबुवांच्या बरोबरीची मंडळी त्यांच्यापेक्षां कमी विद्वान होती असें नाहीं, पण शास्त्रीबुवांनीं स्वतंत्र रीतीनें अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन अशी जी आपल्या कर्तव्याची दिशा ठरविली होती तशी दुसऱ्या कोणीं ठरविली नसल्यामुळें ते प्रवाहानें प्राप्त झालेल्या परिस्थितींतच गढून गेले. शास्त्रीबुवांत व त्यांच्या बरोबरीच्या विद्वानांत जर कांहीं भेद असला तर तो हाच होय. देशस्थितीचा व आपल्या शक्तीचा विचार करून शास्त्रीबुवांनीं आपल्या कर्तव्याचें सुकाणूं एका विवक्षित दिशेनें धरलें होतें ; व इतर व्यवहार जेंव्हां या दिशेच्या आड येऊं लागले, तेंव्हां त्यांनीं आपली दिशा कायम ठेविली आणि इतर व्यवहार सोडून दिले. प्रत्येक सुशिक्षित मनुष्य हें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून जर आपलें कर्तव्य बजावील तर देशाचे पुष्कळ कल्याण होणार आहे. निर्वाहाचें साधन प्रत्येकास पाहिलेंच पाहिजे. पण त्याची सोय झाल्यावर " शतीं दशशतं सोऽपीह लक्षं शतं " या न्यायानें आपली आशा अनावर वाढवून स्वकर्तव्यास विसरणारे पुष्कळ गृहस्थ आमच्यांत आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे निर्वाहाच्या सोईपेक्षां जास्त अपेक्षा न धरतां कर्तव्यास जागणे हेंच खऱ्या सुशिक्षितांचें काम होय. स्वार्थत्याग करा म्हणून कोणी करीत नाहीं, आणि करूं नका म्हणून सांगितल्यानें कोणी रहात नाहीं. कोणीही मनुष्य जी गोष्ट करतो ती त्यास प्रिय असते म्हणूनच करतो, व त्यास प्रिय नसता ती त्यास करणें जरूर पडलें तर त्याच्या हातून ती चांगली वठतही नाहीं. याकरितां स्वार्थापेक्षां कर्तव्य जास्त प्रिय वाटणारी जितकी मंडळी देशांत निघेल तितकी चांगली. मला दोन लाख रुपये मिळाले म्हणजे मी अमुक करीन असें म्हणणारे पुष्कळ लोक असतात. अर्थात् त्यांची प्रीतिही कांहीं विशिष्ट कामापेक्षां दोन लाखांवर जास्त असते. अशा लोकांच्या हातून किंवा लोकांस दाखविण्याकरितां स्वार्थत्याग करणाऱ्या

लोकांच्या हातून काहींएक व्हावयाचें नाहीं. स्वार्थत्याग प्रत्येक माणसानें केला पाहिजे असें नाहीं; पण देशाची व आपली शक्ति मनांत आणून देशकार्याचा योग्य भाग उचलण्यास त्यानें नेहमीं तयार असलें पाहिजे. हा देशसेवेचा भाग करीत असतां स्वार्थत्याग आड न आल्यास उत्तमच होय. पण जेव्हां स्वार्थत्याग आड येईल तेव्हां देशकार्याच्या भागाकडे जो पुरुष वळेल तोच खरा देशहितकर्ता होय. सरकारी नोकरींत शिरून किंवा द्रव्यार्जनाचे दुसरे मार्ग पतकरून फावल्या वेळांत होईल तितकें देशकार्य करणें हाही एक मार्ग आहे. पण भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें स्वार्थाचा आणि परार्थाचा विरोध आला असतां स्वार्थाचा त्याग करून परार्थाकडे वळणारेच पुरुष उत्तम होत. हे पुरुष जाणूनबुजून स्वार्थत्याग करतात असें म्हणण्यापेक्षां परार्थबुद्धीचा त्यांच्या ठायीं उत्कर्ष असल्यामुळें ते स्वार्थाची मातबरी ठेवीत नाहींत असें म्हणणें अधिक सयुक्तिक होय. शास्त्रीबुवा या कोटींतील होते. एरव्हीं कायद्याचा अभ्यास करून अथवा सरकारी नोकरींतच राहून संसारिक दृष्ट्या मोठेपणा संपादन करणें त्यांस कांहीं अवघड नव्हतें, त्यांनीं नोकरी सोडली ती १०० ची होती कीं, ५० ची होती हा मुद्दा नाहीं. निबंधमाला बंद ठेवून किंवा विनोदात्मक लेख लिहून त्यांच्या वेळच्या इतर विद्वानांप्रमाणें त्यांसही सबॉर्डिनेट सर्व्हिसच्या वरच्या पायरीस जातां आलें असतें. पण त्यांच्या स्वभावास ही गोष्ट पसंत नसून त्यांच्या मनानें आपलें कर्तव्य निराळेंच आंखून ठेविलें होतें, त्यामुळें सरकारी नोकरीवर पाणी सोडून अखेरीस ते आपल्या आवडत्या कर्तव्याकडेसच वळले. अशा प्रकारचीं माणसें सुशिक्षित वर्गांत जितकीं जास्त निपजतील तितकीं पाहिजेच आहेत. शास्त्रीबुवांच्या चरित्रांत या प्रसंगापासून जर कांहीं बोध घ्यावयाचा असला तर हाच होय. पण आमच्यांतील कांहीं मंडळी इतकी खमंग आहेत कीं, त्यांस यांत देखील दोषच दृष्टीस पडतो. कां तर शास्त्रीबुवांनीं चाकरी सोडण्यापूर्वीं आपल्या निर्वाहाची आधीं सोय लाविली

म्हणून. अशा तऱ्हेच्या आक्षेपकांस उत्तर देण्यापेक्षां ' अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख ' अशी विधात्याची प्रार्थना करूनच त्यांची रजा घेणें अधिक प्रशस्त होय. असो. शास्त्रीबुवांनी काय कामगिरी केली याच्यासंबंधानें ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करण्याचा आतां काल आलेला आहे. एवढेंच मात्र आतां विशेषेंकरून सांगणें आहे. शास्त्रीबुवांस ज्या गोष्टींचें निराकरण करावें लागलें त्या गोष्टी कोणत्या हें समजून घेतल्याखेरीज त्यांच्या लेखाची योग्यता समजणं कठीण आहे. इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढीची स्थिति जी वर वर्णन केली आहे तिचें बंड कमी होण्यास इंग्रजी शिकलेल्या लोकांची नोकरीच्या दृष्टीनें किंमत कमी होत चालली हें एक तर कारण खरेंच;पण शास्त्रीबुवांचे लेख हें त्याहून बलवत्तर कारण आहे.समाजाणें व्यवस्थित रूप कायम ठेवूनच जी कांहीं सुधारणा करणें असेल ती केली पाहिजे; व इंग्रजी शिकल्यानें सर्वज्ञता येते असें न मानतां उद्योग, सदाचरण, नियमितपणा, देशाभिमान वगैरे गुण संपादन करण्याचा सुशिक्षितांनीं प्रयत्न केला पाहिजे, अशी जर आज थोडी-बहुत समजूत झाली असली तर तिचें प्रवर्तकत्व शास्त्रीबुवांकडेसच येतें. गेल्या पांचपंचवीस वर्षांत राष्ट्रीय सभेसारख्या ज्या चळवळी झाल्या त्यामुळें व इतर अनेक कारणांमुळें डोळे बरेच उघडत चालले आहेत हें खरें आहे; पण इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या घोटाबरोबर जो अव्यवस्थितपणाचा मद आला होता तो शास्त्रीबुवांनीं दूर केला हें आपणास कबूल केलें पाहिजे. अशा प्रकारें एकदां एका बाजूस वळलेल्या ओघास केवळ आपल्या लेखणीनें अडवून धरून लोकप्रवृत्ति, सदाचार व खरा देशाभिमान यांजकडे वळविणें हें कांहीं लहानसान काम नव्हे व तें ज्यानें अवघ्या ३२ वर्षांच्या वयांत केलें त्याची योग्यताही सामान्य लोकांच्या योग्यतेपेक्षां पुष्कळच अधिक असली पाहिजे, हें कोणीही प्रांजल बुद्धीच्या मनुष्यास कबूल करावें लागेल. शास्त्रीबुवांच्या बरोबरीच्या व तदुत्तरकालीन लोकस्थितीचें ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करण्याची वेळ अद्याप आलेली नाही. पण ती

येईल तेव्हां शास्त्रीबुवांच्या कर्तबगारीबद्दल त्यांस योग्य मान मिळून इंग्रजी शिक्षणानें आमच्या मंडळींच्या मनांत पहिल्यानें उत्पन्न झालेला चंचलपणा उत्तरोत्तर कमी होत जाऊन स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश व विशेषतः करून आपल्या देशांतले व प्रांतांतल लोक यांच्यासंबंधानें सुशिक्षित मंडळी आपलें कर्तव्य ओळखण्यास लागली; व नीति, सदाचार आणि निश्चय यांच्या आश्रयानें तें कर्तव्य पार पाडूं लागली असें म्हणण्याची पाळी येईल अशी मला उमेद आहे. मी जें विवेचन केलें आहे तें अद्याप बरेंच अपूर्ण आहे. तथापि तेवढ्यानें या विषयाची ऐतिहासिकदृष्ट्या चर्चा करण्याची लोकांची प्रवृत्ति होईल तर माझ्या अल्प श्रमाचें चीज झालें असें मी समजेन. ”

असें म्हणण्यापेक्षां त्यांचे दिवस संपायची वेळ आणि शास्त्रीबुवांच्या कारकीर्दीचा आरंभ एक झाला हें म्हणणें अधिक सयुक्तिक होय. शास्त्रीबुवांनीं या चळवळींतील पोंचटपणा ताबडतोब ओळखून तिकडे आपल्या लेखांचा मोर्चा फिरविला, हें त्यांच्या मार्मिकपणाचें फल आहे; व त्यांच्या ठिकाणीं त्या वेळीं दुसरा कोणीही पुरुष असता तरी त्यानें असेंच वर्तन केलें असतें. वरील हकीकतीवरून सवंग लोकप्रियता मिळविण्याकरितां शास्त्रीबुवांनीं आपल्या वेळच्या चळवळीवर हल्ला केला असा जो कित्येकांचा आक्षेप आहे तो किती निरर्थक आहे हें सहज दिसून येईल. शास्त्रीबुवांनीं ज्या चळवळीवर हल्ला केला त्यांचा पोकळपणा व त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या वर्तनाचा अव्यवस्थितपणा लोकांच्या नजरेस येऊन पुष्कळ दिवस झाले होते. परंतु या पुढारी म्हणविणाऱ्या मंडळींच्या कह्यांतून त्यांच्याच योग्यतेचा पुरुष अद्याप कोणी बाहेर पडला नसल्यामुळें पुष्कळांस जरी या चळवळी उतावळीच्या व अविचाराच्या वाटत तरी त्यासंबंधीं सोपपत्तिक लेख लिहून सदर चळवळींची अगर त्यांच्या पुरस्कर्त्यांची खरी स्थिति लोकांपुढें मांडण्यास कोणी तयार झाला नव्हता. विष्णुशास्त्री हे अशा प्रकारचे पहिलेच टीकाकार होत. यांस मार्मिकपणाचा संस्कार पितृपरंपरेनें प्राप्त झाला होता, व मराठी आणि संस्कृत ग्रंथांशीं त्यांचा परिचयही इतरांपेक्षां सहजगत्या अधिक झालेला असून हिंदुस्थानच्या व पाश्चिमात्य राष्ट्रांच्या इतिहासाच्या वाचनानें व मननानें राष्ट्राच्या अभ्युदयास कोणत्या प्रकारचे पुढारी लागतात अथवा त्यांच्या अंगीं कोणते गुण असावे लागतात हें त्यांस जास्त चांगलें अवगत झालेलें होतें.

इतके गुण असूनही ते कदाचित् पूर्वींच्या पिढीच्या विद्वानांच्या धर्तीवर गेले असते; परंतु कालमानानें इंग्रजी शिक्षणाचें महत्त्व कमी होत गेलें होतें व त्यांतल्या त्यांत विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, विष्णुशास्त्री हे स्वभावतःच अल्पसंतुष्ट असल्यामुळें आपल्या विद्येचा व गुणांचा स्वतःच्या बढतीकडे उपयोग करून घेण्यापेक्षां

लोकांत खऱ्या ज्ञानाचा व विचारांचा जेणेंकरून प्रसार होईल तें काम अधिक महत्त्वाचें आहे असें त्यांस वाटत असे. अशा स्थितींत त्यांनीं आपल्या कर्तव्याची जी दिशा ठरविली व ज्या दिशेनें काम करण्याचा आपला निश्चय तडीस नेण्यास त्यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न केला, त्याबद्दल त्यांस नांवें ठेवणें म्हणजे आपलें गाजरपारखेपण व्यक्त करणें होय. एकेश्वरीमताचे किंवा प्रार्थनासमाजाचे पोवाडे शास्त्रीबोवांनीं गाइले नाहींत म्हणून तत्पक्षीय लोक त्यांस नांवें ठेवितात, पण ज्यांनीं ह्या संस्था उभारल्या त्यांपैकीं एका तरी पुरुषानें या संस्थांचीं मतें सयुक्तिक असून सर्व पूर्वाचार सोडून लोकांनीं तीं घेण्यासारखीं आहेत असें प्रतिपादन करण्यांत आपलें सर्वस्व खर्च केलें आहे काय? नाहीं. मग शास्त्रीबुवांनीं त्यांचे पोवाडे गाइले नाहींत म्हणून त्यांस दोष देणें म्हणजे 'मी जें कांहीं भांगेच्या तारेंत बोललों तें दुसरा कोणी पंडित समर्थन करीत नाहीं' म्हणून पंडितवर्गास दूषण देण्याइतकेंच असमंजस नव्हे काय? आपल्या पूर्वीच्या पिढींतील लोकांनी आरंभिलेल्या चळवळी निर्जीव व पोंचट आहेत अशी मनाची एकदां खात्री झाल्यावर त्यांचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडणें हें देशहितासाठीं झटणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य नव्हे काय? आणि शास्त्रीबुवांनीं तें कर्तव्य केलें म्हणून त्यांस कां नांवें ठेवावीं हें मला समजत नाहीं. या चळवळींचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडण्यास ज्या साधनांची जरूर होती तीं सर्व साधनें शास्त्रीबुवांस उपलब्ध होतीं. पहिली गोष्ट अशी कीं, या चळवळी ज्यांनीं उभारल्या होत्या त्यांची नीतिदृष्ट्या, धर्मदृष्ट्या किंवा आचरणदृष्ट्या योग्यता किती होती हें त्यांस पूर्णपणें माहीत होतें. तसेंच दहावीस वर्षांच्या अनुभवानें या चळवळी लोकांस कितपत हितकारक होऊं शकतील याचाही त्यांस अदमास आलेला होता; व त्यांत काय काय दोष आहेत ते ताबडतोब ओळखून लोकांपुढें सदर दोषांचें चित्र हुबेहुब वठविण्याइतका मार्मिकपणा व